cmyk

संपादकीय

## एकल्ली धोरणाने सरकार चालवणे धोक्याचेच

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य स्थितीवर संघर्षविराम लागू झाल्यानंतर दोन दिवसांनी का होईना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून भाषण केले. हा सगळा विषय इतक्या संवेदनशील आणि नाजूक पातळीवर पोहोचला होता की त्यावर राष्ट्रप्रमुख म्हणून मोदींचे भाषण जनतेला अपेक्षितच होते. या परिस्थितीच्या संबंधात देशात दोन वेळा सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठका झाल्या पण त्या दोन्ही बैठकांना मोदी उपस्थित नव्हते.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२२ | शुक्रवार, दि.१६ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## सिंधू जल करार स्थगितच – परराष्ट्र मंत्री

नवी दिल्ली : पाकिस्तानकडून सीमेपलीकडून होणारा दहशतवाद समाप्त होईपर्यंत सिंधू जल करार स्थगितच राहील आणि पाकिस्तानशी केवळ दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीरवर चर्चा होईल' होईल, असे म्हणत भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानसोबतच्या चर्चेबाबत भारताची भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे. भारत–पाकिस्तानमध्ये युद्धबंदीच्या घोषणेनंतर डीजीएमओ स्तरावर चर्चा सुरू झाली आहे. दोन्ही देशांमधील तणावाचे भवितव्य या संवादावर अवलंबून आहे. दरम्यान, भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी हे महत्वाचे वक्तव्य केले. गुरुवारी दिल्लीतील होंडुरास दूतावासाच्या उद्घाटनादरम्यान एस. जयशंकर बोलत होते.

## थोडक्यात...

### भारत पाकिस्तान तणावामुळे चारधाम यात्रेवर परिणाम

भारत–पाकिस्तान तणावामुळे चारधाम यात्रेवर परिणाम नवी दिल्ली–भारत पाकिस्तान तणावाचा चारधाम यात्रेवर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. चारधाम यात्रेकरूंची संख्या ३१ टक्क्यांनी घटली आहे.

### झाडे तोडल्याबद्दल अधिकाऱ्यांना तुरुंगात पाठवू–सुप्रिम कोर्ट

आम्ही अधिकाऱ्यांना तुरुंगातही पाठवू शकतो: सर्वोच्च न्यायालय हैदराबादच्या कांचा गचीबोवली जंगलात झाडे तोडल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तेलंगणाच्या मुख्य सचिव आणि अर्धा डझन अधिकाऱ्यांना तुरुंगवासाची ताकीद दिली आहे.

### पाकिस्तानी हवाई दलाची क्षमता दुबळी–वाशिंग्टन पोस्ट

नवी दिल्ली–भारताच्या हल्ल्यात पाकिस्तानी हवाई दलाची क्षमता दुबळी झाली आहे. पाक एअरबेसचे ३ हँगर,२ धावपट्ट्या, २ इमारतींचे नुकसान झाले आहे. सॅटेलाईट इमेजच्या आधारे वॉशिंग्टन पोस्टने पाकला तोंडावर पाडले आहे. तसेच नूर खान एअर बेसवर पाकिस्तानची २ नियंत्रण केंद्रे नष्ट झाली आहेत, असेही म्हटले आहे.

### ऑपरेशन सिंदूरआधी पंतप्रधान मोदींच्या ४५ गुप्त बैठका

नवी दिल्ली–ऑपरेशन सिंदूरआधी पंतप्रधान मोदींच्या लष्करी अधिकाऱ्यांसोबत ४५ गुप्त बैठका झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पहलगाम हल्ल्याचे उत्तर देण्याचा, सौदी दौऱ्यावर असतानाच मोदींनी घेतला निर्णय होता.

### फेर प्रभाग रचनेचा आदेश

मुंबई–स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा असा आदेश निवडणूक आयोगाने सरकारला दिला आहे. ओबीसी आरक्षणाप्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिल्यानंतर आता निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत.

### अवकाळीचा राज्यात थयथयाट

केवळ मुंबईच नव्हे तर कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील पाच दिवस जोरदार वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. विशेषतः नागपूर, बीड, नांदेड, सातारा, पुणे, कोल्हापूर, रायगड, सिंधुदुर्ग यांसारख्या जिल्ह्यांना अवकाळीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

# कांद्याच्या घसरलेल्या दराने शेतकरी हवालदिल



## किमान २ आठवडे दर कायम रहाण्याची शक्यता

नवी मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील विविध बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या दरात अलीकडे मोठी घसरण झाली असून ग्राहकांना दिलासा मिळाल्याचे चित्र असले तरी शेतकऱ्यांसाठी ही स्थिती हवालदिल करणारी ठरत आहे. वाढलेले उत्पादन, साठवणुकीतील मर्यादा आणि पुरवठा अधिक झाल्याने बाजारात कांद्याचे दर कोसळले असून, त्याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर बसत आहे.**

नाशिक, सोलापूर, अहमदनगर तसेच मध्य प्रदेशातून उन्हाळी कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने एपीएमसी बाजारात दर घसरले असून, सध्या कांदा क्विंटलमागे ८०० ते १७०० रुपयांच्या दरम्यान विकला जात आहे. काही भागांत उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. एका एकर कांद्याच्या उत्पादनासाठी ३० ते ३५ हजार रुपये खर्च येतो. मात्र बाजारभाव केवळ १००० ते १२०० रुपये क्विंटलमागे असल्याने तोट्याचे प्रमाण वाढत आहे, अशी व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होण्याच्या वाटेवर आहेत. केंद्र सरकारने १ एप्रिल २०२५ पासून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यामुळे बाजारपेठेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा होती. मात्र भारत–पाकिस्तानमधील तणावामुळे निर्यात बंदी व पान २ वर

# मराठा आरक्षणासाठी नवे खंडपीठ स्थापन करा!

## सर्वोच्च न्यायालयाचे मुंबई उच्च न्यायालयाला महत्त्वपूर्ण निर्देश

नवी दिल्ली । वृतसंस्था

**मराठा आरक्षण संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना याचिकांवर जलद सुनावणीसाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या पहिल्याच कामकाजाच्या दिवशी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला.**

सरन्यायाधीश गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या द्विपीठासमोर ही सुनावणी झाली. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय एससीबीसी प्रवर्गातंर्गत वैद्यकीय प्रवेशासाठी मराठा विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देण्यात आलेल्या याचिकांवर तत्काळ नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने मुंबई उच्च न्यायालयाला दिले आहेत. या वर्षी जानेवारीमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. त्याविरोधात याचिकाकर्ते पान २ वर




### वैद्यकीय प्रवेशाच्या अनुषंगाने महत्वपुर्ण निर्णय

आगामी शैक्षणिक सत्रामुळे निर्माण झालेली निकड आणि मुंबई उच्च न्यायालयाकडून निर्णय घेण्यास होणारा विलंब याकडे याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालाचे लक्ष वेधले. वैद्यकीय प्रवेशासाठी उशीर होण्याची शक्यता सुनावणीवेळी अधोरेखीत करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाला योग्य ते निर्देश देण्याची विनंती करण्यात आली होती.

# वक्फबाबत अंतरिम दिलासाच्या मुद्यावर विचार करु-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृतसंस्था

**वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५ च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर अंतरिम दिलासा देण्याच्या मुद्यावर २० मे रोजी विचार केला जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने गुरूवार (दि.१५ मे) स्पष्ट केले. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांचे वकील कपिल सिब्बल आणि केंद्राचे प्रतिनिधित्व करणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना सोमवारपर्यंत त्यांचे लेखी नोट्स दाखल करण्यास सांगितले आहे.**

गुरूवारच्या सुनावणीत दोन्ही बाजूंच्या वकिलांनी याचिकांवर विचार करण्यासाठी आणखी काही वेळ लागू शकतो, असे खंडपीठास सांगितले. कोणत्याही परिस्थितीत केंद्र सरकारकडून अशी हमी आहे की वापरकर्त्याच्यावतीने वक्फने स्थापन केलेल्या मालमत्तेसह कोणतीही वक्फ मालमत्ता अधिसूचना रद्द केली जाणार नाही. यापूर्वी, कायदा अधिकाऱ्याने असेही आश्वासन दिले होते की, नवीन कायद्याअंतर्गत केंद्रीय वक्फ परिषद किंवा



राज्य वक्फ बोर्डामध्ये कोणत्याही नियुक्त्या केल्या जाणार नाहीत. २० मे रोजी सुनावणी झाल्यावर १९९५ च्या वक्फ कायद्यातील तरतुदींना स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या कोणत्याही याचिकेवर विचार केला जाणार पान २ वर

# ना.पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या !

## इच्छित स्थळी सहजतेने बदली झाल्याने अधिकारी झाले खुश

पुणे । प्रतिनिधी

**पुन्हा एकदा इतिहास घडविताना या ऐतिहासिक क्षणाची मी साक्षीदार होतेयं याचा मला अतिशय आनंद होत आहे. अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवून भ्रष्टाचारमुक्त धोरण राबविणे यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा निर्णय मी घेतला. हा निर्णय भविष्यातही कायम राहील. गाव पातळीवर कष्ट करणाऱ्या सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्वाचा आहे. तुमच्या बदल्या मनासारख्या केल्या आहेत, आता चांगले आणि फ्रेश मनाने काम करा अशा शब्दांत**



**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांशी संवाद साधला.**

राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा आणि बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक पान २ वर

# मान्सून श्रीलंकेच्या किनाऱ्यावर अरबी समुद्रापर्यंत मजल



पुणे । प्रतिनिधी

**मान्सूनने गुरूवारी अरबी समुद्रापर्यंत मजल मारली. श्रीलंकेच्या किनाऱ्यापर्यंत मान्सून पोहचला आहे. तसेच मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान कायम आहे. त्यामुळे मान्सून पुढील ४ दिवसांमध्ये आणखी पुढे सरकेल. तर राज्यात पुढील ५ दिवस वादळी पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला.**

पोषक हवामान असल्याने मान्सूनने गुरूवारी आणखी काही भागात प्रगती केली. मान्सूनने आग्नेय अरबी समुद्राचा आणखी काही भाग, मालदीव आणि कोमोरिनचा भाग तसेच दक्षिण बंगालच्या उपसागरचा आणखी काही भाग तसेच अंदमान आणि अंदमान समुद्राच्या आणखी काही भागात मान्सूनने प्रगती केली. मान्सून आता श्रीलंकेच्या किनाऱ्यापर्यंत पोहचला पान २ वर

# नारायण राणेंना सर्वोच्च न्यायालयाचा झटका !

## ३० एकर जमीन वन विभागाला परत देण्याचे आदेश



नवी दिल्ली । वृतसंस्था

पुण्यातील राखीव वनजमिनीशी संबंधित प्रकरण हे वनजमीन हडपण्याचे उत्तम उदाहरण आहे. राजकारणी, नोकरशहा आणि बांधकाम व्यावसायिक यांच्यातील संगनमतामुळे मागासवर्गीय लोकांच्या पुनर्वसनाच्या नावाखाली वनजमिनीचे व्यावसायिक कारणांसाठी रूपांतर कसे होऊ शकते, असा प्रश्न उपस्थित करत सर्वोच्च न्यायालयाने फटकारले. तसेच सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना विशेष तपास पथके (एसआयटी) स्थापन करण्याचे निर्देश दिले.

सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अशा जमिनींचा ताबा परत घेण्यासाठी पावले उचलण्याचे आणि ती वन विभागाला हस्तांतरित करण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीशांच्या पहिल्याच निर्णयात पान २ वर

# एमआयएमने मविआचे वाढवले टेन्शन!

## पालिका निवडणुकीबाबत उचलले मोठे पाऊल

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका चार महिन्यात घेण्याचा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यावर सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. आता औवेसींच्या एमआयएमने मविआचे टेन्शन वाढले आहे. पालिका निवडणुकीबाबत निर्णय घेतल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष इम्तीयाज जलील यांनी जाहीर केला.**

येत्या चार महिन्यांत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घ्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. या आदेशानंतर आता निवडणूक आयोगासह राज्यातील सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. यावेळी महापालिकेच्या निवडणुकीत आपलाच झेंडा फडकावा, यासाठी राजकीय पक्षांकडून विशेष रणनीती आखली जात आहे. असे असतानाच राज्याच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेल्या पान २ वर



### इम्तियाज जलील नेमकं काय म्हणाले?

एमआयएमची बैठक झाली. आमचा पक्ष येणाऱ्या सर्व निवडणुका लढवणार आहे. आम्ही लवकरच सदस्यता मोहीम राबवणार आहोत. फक्त महानगर पालिकाच नाही, तर सर्व निवडणुका पूर्ण ताकदीने लढवल्या जाणार आहेत, असं जलील यांनी स्पष्टपणे सांगितले अहे. तसेच भाजपाची सोशल मीडिया टीम पैशाने कोणतीही बातमी पसरवते. एमआयएमची मजबूत सोशल मीडिया टीम तयार केली जाईल. राष्ट्रीय प्रवक्त्याचीही नियुक्ती केली जाईल, अशी माहिती जलील यांनी दिली.

# राज्यातील १८ लाख रेशन कार्ड रद्द

## ई–केवायसी प्रलंबित असल्याने घेतला निर्णय




मुंबई । प्रतिनिधी

राज्यात १८ लाख रेशन कार्ड रद्द करण्यात आले आहेत. तसेच दीड कोटींहून अधिक कार्डधारकांची ई–केवायसी प्रलंबित आहे. आधार लिंकसाठी केंद्र सरकारच्या ई–केवायसी मोहिमेनुसार राज्यातील १७.९५ लाख रेशन कार्ड रद्द करण्यात आले आहेत. मुंबईत सर्वाधिक ४.८० लाख तर ठाण्यातील पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ४४.५० क्विंटल | | |
| २,३०० | २,९३९ | २,६४२ |
| ज्वारी/हायब्रिड: १५३.५० क्विंटल | | |
| २,००० | ३,०५० | २,३६२ |
| मका/लोकल:२८.०० क्विंटल | | |
| २,१५१ | २,१८१ | २,१६६ |
| तूर : ५०.०० क्विंटल | | |
| ६,५१० | ६,७६५ | ६,६९२ |
| उडीद : १.०० क्विंटल | | |
| ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १३५.०० क्विंटल | | |
| २,१८० | २,६९० | २,४५१ |
| मुग :४.५० क्विंटल | | |
| ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | | |
| ४,०५० | ४,३०० | ४,२०७ |
| हरभरा: १६.५० क्विंटल | | |
| ५,३०० | ५,४८० | ५,४०० |

cmyk

## अग्रलेख

# एककल्ली धोरणाने सरकार चालवणे धोक्याचेच

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य स्थितीवर संघर्षविराम लागू झाल्यानंतर दोन दिवसांनी का होईना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून भाषण केले. हा सगळा विषय इतक्या संवेदनशील आणि नाजूक पातळीवर पोहोचला होता की त्यावर राष्ट्रप्रमुख म्हणून मोदींचे भाषण जनतेला अपेक्षितच होते. या परिस्थितीच्या संबंधात देशात दोन वेळा सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठका झाल्या पण त्या दोन्ही बैठकांना मोदी उपस्थित नव्हते. संघर्ष सुरू असताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी परस्पर युद्धविरामाची घोषणा कशी केली यावरही देशात उलट सुलट चर्चा सुरू असताना पंतप्रधानांनी अधिकृत भूमिका स्पष्ट करण्याला खूपच महत्त्व होते. त्या अनुषंगाने मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून जे भाषण केले त्यात काही खुलासा करणे अपेक्षित होते, परंतु दुर्दैवाने तो विषयही मोदींनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात दुर्लक्षितच ठेवला.

किंबहुना अमेरिकन हस्तक्षेपाचा साधा उल्लेखही त्यांनी केला नाही. बाकी मोदी यांनी आपल्या संबोधनात भारत सरकारची खूप आधीपासूनची जी भूमिका आहे त्याचीच पुनरुक्ती केली. यावेळी सरकारने युद्धजन्य स्थितीवर तात्पुरती स्थगिती आणली आहे, पण पुन्हा पाकिस्तान कडून आगळीक झाली तर आम्ही आमच्या अटी आणि शर्तीवर त्याला प्रत्युत्तर देऊ असेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले आहे. पण हे सगळे असतानाही शस्त्रसंधी किंवा संघर्ष विराम कोणत्या अटींवर झाला याचाही खुलासा देशाला होणे अपेक्षित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या पक्षाचे नेतृत्व करतात किंवा ते ज्या विचारधारेचे पाईक आहेत त्या विचारधारेच्या लोकांनी गेली अनेक दशके पंडित नेहरू यांनी काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रात का नेला हा मुद्दा सातत्याने उपस्थित केला आहे, या पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षाचा मुद्दा आज अमेरिकेकडे कसा नेला गेला या प्रश्नाला मोदी यांनीच उत्तर द्यायचे आहे. शिमला करारानुसार भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी आपसातील मतभेद हे आपसात चर्चा करूनच सोडवायचे आहेत, त्यात जगातल्या कोणत्याही तिसऱ्या देशाला वाव द्यायचा नाही इतके स्पष्ट ठरलेले असतानाही भारताने तिसऱ्या देशाची मध्यस्थी का मान्य केली हा प्रश्न आता मोदी किंवा भाजप यांची पाठ सोडणार नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सातत्याने वेगवेगळे ट्विट करून या सगळ्या प्रक्रियेचे नेतृत्व केवळ आपल्याकडेच आहे आणि आपल्या इशाऱ्यावर भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी शस्त्रे खाली ठेवली आहेत असे जगाला सांगितले आहे. हे सांगतानाच आपण या दोन्ही देशांना व्यापार थांबवण्याची कशी धमकी दिली आणि त्यानुसार दोन्ही देशांनी लगेच कशी शस्त्र संधी केली याची फुशारकी मारली आहे.


डोनाल्ड ट्रम्प एवढेच करून थांबलेले नाहीत तर काश्मीर प्रश्नात या पुढील काळात आपण मध्यस्थी करू आणि हा प्रश्न निकाली लावू असेही त्यांनी म्हटले आहे. जर अमेरिकन अध्यक्षांनी इतक्या स्पष्ट शब्दात भारताच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा इरादा व्यक्त केला असेल तर त्यावर भारतीय पंतप्रधानांनी प्रत्युत्तर देणे क्रमप्राप्त होते. किंबहुना अमेरिकन अध्यक्षांचा कोणताही हस्तक्षेप यापुढे भारत सहन करणार नाही अशी भूमिका तरी मोदी यांनी स्पष्ट करायला हवी होती, पण काल राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात मोदी यांनी यावर काहीही भाष्य केलेले नाही. त्यातून अनेक प्रश्न आणि उपप्रश्न देशापुढे उभे राहत आहेत. सरकारही विनाकारण संशयाच्या गर्तेत ढकलले जात आहे, याची जाणीव सरकारला ठेवावी लागेल. युद्धजन्य स्थितीत सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आपल्या तोंडावर नियंत्रण ठेवून सरकारला एकमुखी पाठिंबा दिला होता, पण आता शस्त्रसंधी झाल्यानंतर काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षनेते पत्रकार परिषदा घेऊन सरकारवर प्रश्नांची सरबत्ती करू लागले आहेत. या विषयावर संसदेचे विशेष अधिवेशन घेण्याची मागणी विरोधी पक्षाने केली पण त्याकडेही सरकारने लक्ष दिले नाही. दोन्ही देशातील संघर्ष ही केवळ एकट्या सरकारची जबाबदारी नसते, त्या प्रक्रियेत देशातील नागरिकांना आणि विरोधकांना विश्वासात घ्यायचे असते, त्यांच्या सूचनांचा आणि भूमिकांचा विचार करायचा असतो त्यासाठीच संसदेचे विशेष अधिवेशन आवश्यक ठरते. हा मुद्दाही सरकारला लक्षात घ्यावा लागेल. सगळे काही आपल्या स्वतःच्या एककल्ली धोरणानेच चालेल अशा खाक्याने सरकार चालवणे हे परिपक्वतेचे लक्षण मानता येत नाही. या पार्श्वभूमीवर सरकारला आता नव्याने पुन्हा जनतेपुढे जाऊन या सगळ्या प्रश्नांवर उत्तरे देण्याखेरीज दुसरा मार्ग नाही एवढे मात्र खरे.

## शिवसंग्राम मध्ये असंख्य युवकांचा जाहीर प्रवेश

# स्व.मेटे यांचे सजग समाज निर्मितीचे स्वप्न पूर्ण करायचे आहे-डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

**लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला असून येणाऱ्या काळात शिवसंग्रामच्या माध्यमातून युवक,तरुण ,विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी लढा देण्याचे आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचा निर्धार यावेळी युवकांनी केला या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, उपाध्यक्ष रामदास**




**नाईकवाडे,धर्मराज मागदे सर , मनोज जाधव, विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील, अशोक लोकरे, शेषेराव तांबे, कैलास शेजाळ आदी. उपस्थित होते.**

डॉ. ज्योती मेटे यांच्या उपस्थितीत आज असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी मंचावर शिवसंग्राम चे विविध पदाधिकारी उपस्थित होते. हा पक्षप्रवेश शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आला असून यावेळी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी त्यांच्या हयातीमध्ये युवक, तरुण, विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी केलेले कार्याला उजाळा देताना डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या की, मेटे साहेबांनी त्यांच्या हयातीमध्ये अनेक तरुणांना रोजगार मेळाव्यांचे आयोजन करून त्यांच्या हाताला काम दिले त्याचबरोबर पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवण्याचे काम केले, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना दर रविवारी पुणे येथे मोफत जेवणाची व्यवस्था केली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सजग समाज निर्मितीसाठी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे यासाठी व्यसनमुक्तीचा लढा उभा केला या सर्व कार्यांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम मध्ये युवक मोठ्या प्रमाणात सामील होत आहेत याचा मनस्वी आनंद होत आहे. आपण सर्व एकत्रितपणे मेटे साहेबांचे सजग समाज निर्मितीचे स्वप्न पूर्ण करू आणि शिवसंग्राम तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करू अशी साद त्यांनी यावेळी घातली. यावेळी प्रवेश केलेल्या युवकांना आणि विद्यार्थ्यांना विद्यार्थी आघाडीच्या विविध पदांवर जबाबदारी देण्यात आली. या पक्षप्रवेशा वेळी विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी निवडण्यात आली यात शिवसंग्राम विद्यार्थी आघाडी जिल्हा सरचिटणीस पदी तुषार डोळे, जिल्हा उपाध्यक्षपदी वैभव घुमरे, अनिकेत साळवे, शहराध्यक्षपदी आकाश हाजारे, शहर उपाध्यक्षपदी अहिलेश वाघमारे, शहर सचिव पदी उदयराज कुलकर्णी, शहर सहसचिव पदी प्रद्युम्न परजणे यांची निवड करण्यात आली.

# महिला शेतकऱ्यास कर्जमाफी सह नुकसान भरपाई देण्याचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेपासून वंचित ठेवलेल्या महिला शेतकऱ्याचे कर्ज व्याजासह माफ करून नुकसान भरपाई देण्याचे आदेश जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने एका बॅंकेस दिले आहेत.**

चुरमापुरी ता. अंबड येथील शेतकरी अमिना शेख इमाम शेख यांनी सन २०१४ साली वडीगोद्री ता. अंबड येथील एका ग्रामीण बॅंकेतून पीककर्ज घेतले होते.दुष्काळी परिस्थितीमुळे त्यांना कर्ज भरता आले नाही. बॅंकेने कर्जाचे पुर्नगठण केले.सन २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीत निर्माण झालेली दुष्काळग्रस्त परिस्थिती, शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने म. ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना घोषित केली होती. सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी अमिना शेख इमाम शेख यांनी कागदपत्रांची पुर्तता करून बॅंकेकडे प्रस्ताव सादर केला. शासन निर्णयाची माहिती घेऊन चौकशी केली असता बॅंकेने तालुका निबंधक कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवल्याचे सांगितले. तालुका निबंधक कार्यालयाकडून सदर योजना बंद झाल्याचे सांगण्यात आले. लाभ मिळत नसल्याने हताश झालेल्या अमिना शेख इमाम शेख यांनी ॲड. मयुर ढवळे यांच्या मार्फत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली. आयोगासमोर झालेल्या सुनावणी दरम्यान ॲड. मयुर ढवळे यांनी सक्षम पणे बाजू मांडतांना बॅंकेने सेवेत त्रुटी ठेवत अनुचित व्यापार प्रथेचा अवलंब करून ग्राहक असलेल्या महिला शेतकऱ्यास कर्जमुक्ती योजनेपासून वंचित ठेवले, असे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, सादर झालेल्या पुराव्यांचे अवलोकन करून अमिना शेख यांचे कर्जखाते '' छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना- २०१७ '' मध्ये बसत असल्यामुळे सदर योजनेचा लाभ मिळण्यास पात्र आहेत. असे मत आयोगाने नोंदवले. अमिना शेख यांचा अर्ज मंजूर करत ३१ मार्च २०१५ रोजी थकीत असलेले कर्ज, आजपर्यंत च्या व्याजासह माफ करावे तसेच त्यांना झालेल्या मानसिक, शारीरिक त्रास व तक्रार खर्च असे एकूण १० हजार रुपये द्यावेत असे आदेश ग्राहक आयोगाच्या अध्यक्षा अपर्णा काटे, सदस्य उदय दळवी, संतोष निकुले यांनी सदरील बॅंकेस दिले आहेत. अर्जदारांच्या वतीने ॲड. मयुर ढवळे यांनी बाजू मांडली.

# पाटोद्याच्या सब रजिस्टार पाटील यांच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करून त्वरित बदली करा-झेंड

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा येथील सहायक दुय्यम निबंधक सबरजिस्टर कार्यालयामध्ये पाटील नावाचे सबरजिस्टर हे अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसले आहेत अनेक जमिनीच्या व प्लॉटच्या बोगस खरेदी विक्री रजिस्ट्री केल्या असुन आताही चालू असून ते या कार्यालयात अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसले असुन या कार्यालयाच्या गेल्या पाच वर्षातील सर्व खरेदी विक्रीची व इतर सर्व कामकाजाची उच्च स्तरीय चौकशी समिती नेमुन चौकशी करून संबंधितांवर कारवाई करुन त्यांची त्वरित बदली करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते गोरख झेड यांनी केली आहे.**

पाटोदा येथील सहायक दुय्यम निबंधक कार्यालयात असणारे सबरजिस्टर पाटील हे अनेक वर्षांपासून पाटोदा येथील कार्यालयात ठाण मांडुन बसले असून या ठिकाणी दररोज अनेक प्रकारच्या गुंठेवारी नसणाऱ्या सह एकच एन ए अनेक खरेदी विक्री रजिस्ट्रीसाठी वापरले जात असुन बोगस रजिस्ट्री खरेदी विक्री होत असून यामध्ये मोठ्या प्रमाणात मिलीभगत होत आहे त्यामुळे निषपाप शेतकऱ्यांना मात्र त्रास सहन करावा लागत असुन या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमुन चौकशी करून सबरजिस्टर यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी बहुजन वंचित आघाडीचे उपाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते गोरख झेंड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

# पांगरखेडाजवळ कारच्या धडकीत दुचाकीस्वार ठार

अंबड । प्रतिनिधी

अंबड घनसावंगी रोडवर पांगरखेडा येथे गुरुवार, १५ मे रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास बुलेट व कारचा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार शुभम वसंत किडे वय २४ वर्ष हा दूध व्यवसाय करत होता. बोधलापुरीहून अंबडकडे बुलेट क्रमांक २१ ८३५४ वर जात असताना, समोरून येणाऱ्या कार क्रमांक २० २४९७ सोबत पांगरखेडा जवळ अपघात झाला. गंभीर जखमी अवस्थेत त्याला अंबड येथील खासगी व नंतर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याचे शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

# उपजिल्हाधिकारी यांचे आदेशाला केराची टोपली

**जालना । प्रतिनिधी**

**निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी केलेल्या आदेशाला कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा व गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबड, ग्रामसेवक यांच्याकडून उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आली आहे यासंदर्भात आज जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की ,मौजे कोळी सिरसगाव तालुका अंबड येथील दलित वस्तीमधील पाणी मिळत नसुन गावातील सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी जातिसुड भावनेले पाणी मिळत नसल्याबाबत. तक्रार झाली होती या तक्रारीत श्रीमती नंदाबाई अशोक नरवडे व इतर गावकरी रा. कोळी सिरसगाव ता. अंबड यांनी निवेदन दि.०६/०५/२०२५ जिल्हाधिकारी जालना यांना देण्यात आले होते.**

उपरोक्त विषयी, श्रीमती नंदाबाई अशोक नरवडे व इतर गावकरी मौजे कोळी सिरसगाव मधील दलित उत्तीला १०-१५ दिवस पाणी येत नाही. सदर प्रकरणी सरपंच यांना बोलले असता सरपंच म्हणाले की काय काय करायचे ते करून घ्या. माझे कोणी वाकडे करु शकत नाही. शिवाय पाणी सोडणाराने शिवीगाळ केली. काय करायचे ते करा. पाणी सोडीत नाही असे बोलले. आम्ही दलित मागसवर्गीय असुन जाणिवपुर्वक विहीरीतील पाणी उपसले जाते आणि आम्हाला पाणी मिळत नाही. आम्हाला नळ नसल्यामुळे पाणी प्रश्न अत्यंत बिकट आहे म्हणून आपण सदर प्रकरणी तात्काळ चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी व न्याय दयावा नसता, आम्हाला गावाला आमरण उपोषण केल्याशिवाय पर्याय नाही असे निवेदनात नमुद केले होते. याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करावे असा आदेश उपजिल्हाधिकारी यांनी संबंधित सर्व विभागांना करण्यात आले होते परंतु या आदेशाचे कोणतंही पालन पंचायत समिती अंबड व ग्रामसेवक, तसेच ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता यांनी कोणतीच दखल न घेतल्यामुळे सदरील नागरिक १५मे रोजी जिल्हाधिकारी यांची भेट घेतली तसे निवेदन आज परत देण्यात आले.

## पान १ वरून...

### कांद्याच्या घसरलेल्या

बांग्लादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे निर्यातीत मोठी घट झाली आहे. परिणामी, दर स्थिर होण्याऐवजी आणखी घसरले आहेत. नवी मुंबई एपीएमसी बाजारात दररोज १०० ते १५० गाड्यांद्वारे कांद्याची आवक होत असून, यामुळे चांगल्या प्रतीचा कांदा सध्या घाऊक बाजारात केवळ १० ते १५ रुपये किलो दराने विकला जात आहे. दोन महिन्यापूर्वी हेच दर ३५ ते ४० रुपये किलो होते. तर दुसऱ्या प्रतीचा कांदा १ ते ५ रुपये किलो या किमतीने विकला जात आहे. व्यापाऱ्यांच्या अंदाजानुसार पुढील १५ ते २० दिवस दर असेच राहण्याची शक्यता आहे.

------------

### वक्फबाबत अंतरिम दिलासाच्या मुद्यावर

नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे. ''आम्ही पुढील सुनावणीवेळी म्हणजे मंगळवारीच अंतरिम दिलासा देण्याच्या मुद्द्यावर विचार करू,'' असे सरन्यायाधीश गवई यांनी आजच्या सुनावणीवेळी स्पष्ट केले.

**सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्तावाला विरोध**

केंद्रीय वक्फ परिषदा आणि मंडळांमध्ये गैर-मुस्लिमांना समाविष्ट करण्याची परवानगी देणाऱ्या तरतुदीला स्थगिती देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने विरोध केला आहे. वापरकर्त्याच्या वतीने वक्फसह वक्फ मालमत्तांच्या विमुद्रीकरणाविरुद्ध अंतरिम आदेश देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्तावालाही सरकारने विरोध केला आहे. वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५ च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळून लावाव्यात, अशी विनंती केंद्राने सर्वोच्च न्यायालयाला केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची संमती मिळाल्यानंतर केंद्र सरकारने ५ एप्रिल रोजी वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५ अधिसूचित केला होता.

---------

### मराठा आरक्षणासाठी

सुप्रीम कोर्टात पोहचले. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना मराठा आरक्षण देणाऱ्या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर जलद सुनावणी करण्यासाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले. न्यायमूर्ती उपाध्याय हे पूर्ण किंवा तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग होते जे गेल्या वर्षी एप्रिलपासून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय कायदा, २०२४ विरुद्धच्या याचिकांवर सुनावणी करत होते.

-----------

### नारायण राणेंना सर्वोच्च

फभाजप खासदार आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणेंना दणका बसला आहे. सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांनी पहिला निकाल दिला, तो पुण्यातील वन विभागाच्या जमिनीशी संबंधीत आहे. वन विभागाची पुण्यातील ३० एकर जागा बिल्डरला देण्याचा निर्णय म्हणजे राजकारणी, प्रशासकीय अधिकारी खासगी बिल्डरसोबत कसे काम करतात याचे ढळढळीत उदाहरण आहे. वन विभागाची पुण्यातील कोंढवा भागातील शेकडो कोटी रुपयांची ३० एकर जागा रिची रिच सोसायटीसाठी बिल्डरला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी पुरातत्व खात्याच्या रेकॉर्ड्र्समध्ये फेरफार करण्यात आले होते. हे सर्व उघडकीस आल्यानंतर या जागेबाबतचे सर्व निर्णय बेकायदेशीर ठरवून ही जागा वन विभागाला परत देण्याचा निर्णय गवई यांनी दिला आहे. जर जमिनीचा ताबा परत घेणे सार्वजनिक हिताचे नसल्यास राज्य सरकारे/केंद्रशासित प्रदेशांनी ज्या व्यक्तींना/संस्थांना वाटप करण्यात आले आहे त्यांच्याकडून त्या जमिनीची किंमत वसूल करावी आणि ती रक्कम जंगलांच्या विकासासाठी वापरावी, असे खंडपीठाने म्हटले आहे. तसेच सर्व राज्यांचे मुख्य सचिव आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासकांनी असे सर्व हस्तांतरण आजपासून एका वर्षाच्या आत होईल याची खात्री करण्यासाठी विशेष पथके स्थापन करण्याचे निर्देश दिले.

-------------

### ना.पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत

निर्णय पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नुकताच घेतला होता. या बदल्यांची प्रक्रिया आजपासून आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयात ना. पंकजाताईंच्या उपस्थितीत सुरू झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पशूसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी, आयुक्त प्रवीण कुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे यावेळी उपस्थित होते. ग्रामविकास मंत्री असताना शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांचा निर्णय मी घेतला होता, त्यावेळी त्याचा फायदा अनेक शिक्षकांना जे तिथपर्यंत पोहोचू शकत नव्हते त्यांना झाला. आऊट ऑफ बॉक्स जाऊन निर्णय घेण्याची आवड असल्याने आताही पशुसंवर्धन विभागासाठी मी हा निर्णय घेतला. एकदा घेतलेला निर्णय बदलत नाही, त्यामुळे भविष्यातही हा निर्णय कायम राहणार आहे. माझे वडील लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे, ज्याची पत नाही, ऐपत नाही त्यांचा आवाज बनण्यासाठी मी राजकारणात आहे, अगदी तोच वारसा घेऊन मी काम करत आहे. माझ्यावर प्रेम करणारे असंख्य लोकं आहेत, त्यांच्यासाठी तुम्ही काम करता, त्यामुळे हा निर्णय घेतला. सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला महत्वाचा वाटतो. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी आपल्या परिवारापासून दूर असणारे, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना यामुळे हवी ती पोस्टींग मिळणार आहे. हव्या त्या ठिकाणी बदल्या झाल्याने तुमच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद समाधान देणारा आहे असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

**हवी ती पोस्टींग मिळाली, अधिकारी खूश!**

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही आजपासून सुरू झाली असून उद्याही म्हणजे १६ मे रोजी ही कार्यवाही सुरू असणार आहे. आज आदिवासी व नक्षलग्रस्त अवघड क्षेत्रात असलेल्या ११८ आणि बिगर अवघड क्षेत्रात असलेल्या ४४४ अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या मनाप्रमाणे करण्यात आल्या. ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे मनाप्रमाणे आणि सहजतेने हवी ती पोस्टींग मिळाल्याने अधिकारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**खूप चांगला निर्णय-डॉ.आकाश ठाकरे**

मी यवतमाळ जिल्ह्यातील आहे, माझी पहिली पोस्टींग २०२२ मध्ये त्र्यंबकेश्वर येथे झाली. आदिवासी क्षेत्रात तीन वर्ष सेवा दिली. आता समुपदेशनाने मला माझा जिल्हा मिळाला. मला खूप आनंद झाला. ना. पंकजाताईंनी घेतलेला निर्णय आमच्या सारख्या अधिकाऱ्यांचे मनोबल वाढविणारा आहे.

**डॉ. प्रियंका स्वामीदास**

मी सिरोंचा तालुक्यात कार्यरत होते. हा भाग तेलंगणा सीमेवर असल्याने इथे मराठीपेक्षा तेलगू बोलली जाते. मला तेलगू भाषा येते.खेड्यातील लोकांशी चांगला संवाद साधता येतो. लोकं म्हणाले तुमची बदली झाल्यावर आमचे कसे होईल? आता समुपदेशनाने मी इथेच राहिले. हवे असलेले ठिकाणी मिळाल्याने मी खूश आहे. खरचं हा निर्णय ऐतिहासिक आहे. मंत्री महोदय ना. पंकजाताईंचे खूप खूप आभार!

----------

### राज्यातील १८ लाख

१.३५ लाख रेशन कार्ड रद्द करण्यात आले आहेत. तसेच राज्यातील एकूण ६.८५ कोटी कार्डपैकी ५.२० कोटींचे ई-केवायसी पूर्ण झाले आहेत. तर १.६५ कोटी रेशन कार्ड धारकांकडून ईकेवायसी करणे अजूनही बाकी आहे. अंतिम मुदत संपली असली तरी शासन निर्देश येईपर्यंत केवायसी सुरू राहणार आहे. त्यामुळे शिधाधारकांना लाभ मिळत राहणार आहे.

---------------------------

### एमआयएमने मविआचे

एमआयएम या पक्षाने मोठा निर्णय घेतला आहे. या पक्षाने घेतलेल्या निर्णयाचा फटका आता महाविकास आघाडीला बसतो की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. एमआयएमने पालिका निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. यापुर्वी ज्या ज्या ठिकाणी एमआयएमने पालिका निवडणुका लढवल्या त्याचा मविआला मोठा फटका बसलेला असून अप्रत्यक्ष भाजप महायुतीला फायदा झालेला आहे.

-------

### मान्सून श्रीलंकेच्या किनाऱ्यावर

आहे. मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून दक्षिण अरबी समुद्राच्या आणखी काही भागात, मालदीव आणि कोमोरीनचा भाग, दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमानाच उर्वरित भाग आणि मध्य बंगालच्या उपसागराचा उरलेला भाग मान्सून काबीज करेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. राज्यातील काही भागात पुढील ५ दिवस वादळी पावसाचा अंदाज आहे. विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातही पावसासाठी पोषक हवामान आहे. विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर जिल्ह्यात काही भागात विजा आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या वादळी पावसाचा अंदाज आहे.

मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. लातूर, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातही काही भागात विजा आणि ढगांच्या गडगडाटासह वादळी पावसाचा अंदाज आहे. खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी पाऊस दणका देण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात पुढील ५ दिवस विजा आणि ढगांच्या गडगडाटासह वादळी पावसाचा अंदाज आहे. काही जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आला. कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्येही पुढील ५ दिवस काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....


शुक्रवार दि. १६ मे २०२५



## ९४ %गुण मिळवत अलिशा जावेद पठाणचे दहावीत घवघवीत यश

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी येथील पत्रकार जावेद पठाण यांची कन्या अलिशा जावेद पठाण हिने माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी)च्या परिक्षेत ९४% गुणाने उत्तीर्ण होत दहावीत घवघवीत यश मिळवले आहे.**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र () परीक्षेत परळी वैजनाथ येथील फाउंडेशन स्कूलच्या विद्यार्थिनी कु. अलिशा जावेद पठाण हिने ९४.००% गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

अलीशा च्या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार आहे. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे तिने सांगितले. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत असून सर्व पत्रकार, सामाजिक ,राजकीय, शैक्षणीक स्तरातून तिचे अभिनंदन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक सह सर्व शिक्षकवृंदांनी तीचे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्रशासकीय अधिकारी पवनचक्की कंपन्यांना शेतकऱ्यांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचे सल्ले देऊ लागले ; कुंपनच शेत खाऊ लागले

## पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील शेतकऱ्यांचा गंभीर आरोप – डॉ.गणेश ढवळे

पाटोदा । प्रतिनिधी

पवनचक्की कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत.शेतकरी प्रशासनाकडे तक्रारी करत आहेत.मात्र त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून कंपन्या पाळलेल्या गुंडासह सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांच्या शेतातुन विनापरवाना व कोणताही मावेजा न देताच खंडणीचे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत आहेत.महसुल व पोलीस प्रशासन त्यांचे पगार पवनचक्की कंपन्या करत असल्यागत गुलाम होऊन पवनचक्की कंपन्यांना अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन नियमबाह्य मदत करत असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यातच गंभीर बाब म्हणजे पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार हे पवनचक्की कंपन्यांच्या आधिका–यांना शेतकऱ्यांनी कामास आडकाठी केली तर त्यांच्यावर खंडणीचे गुन्हे दाखल करा पुढचं आम्ही पाहुन घेऊ असं खुलेआम शेतकऱ्यांसमोर म्हणून पवनचक्की कंपन्यांच्या मुजोरीला बळ देत असल्याचा गंभीर आरोप अशोक कोटुळे,दासु बोराडे,चंदु बोराडे, बापु बोराडे,लक्ष्मण कोटुळे , अनिकेत




जाधव व ईतर शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना केला आहे.

पाटोदा तालुक्यातील जवळाला शिवारातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे नुकसान करून पवनचक्की कंपन्यांच्या गाड्या जात असल्याची तक्रार आठवडाभरापुर्वी प्रशासनाकडे केली होती.मात्र त्या तक्रारीची दखल घेतली नाही.उलट कंपन्यांच्या गाड्यांना जाण्यासाठी रस्ता मोकळा करून देण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासन घटनास्थळी पोहोचले.गाड्या सुरळीत मार्गी लावण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांनी नायब तहसीलदार दहिफळे यांना घटनास्थळी पाठवले.शेतक–यांची बाजु प्रशासनाने ऐकून घेतलीच नाही. पोलिस बंदोबस्त आणि पवनचक्की कंपन्यांचे कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना अगदी घेराव घालून गाड्या मार्गस्थ केल्याचे शेतकरी कोटुळे यांनी सांगितले. याच वेळी प्रशासनाचा एक माणूस आणि ईतर कंपनीचे कर्मचारी एकत्र येऊन शेतकऱ्यांना न विचारताच खुणा करत होते. उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी जर कामात कोणी आडवे आले तर त्यांच्यावर खंडणीचे गुन्हे दाखल करा असा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समितीची स्थापना केलेली आहे. या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे. तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांची निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाकडे प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून योग्य ती कारवाई करणे. जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतमालक, शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे. इत्यादी अधिकार दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि पोलीस अधीक्षक बीड हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तहसीलदार सचिव आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीव दुर्लक्ष होत आहे. आता तर संनियंत्रण समितीचे अध्यक्ष आणि सचिवच शेतकऱ्यांचे ऐकुन न घेता पवनचक्की कंपन्यांना शेतकऱ्यांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचा सल्ला देत असल्याचा आरोप शेतकरी करत असतील तर कुंपतच शेत खात असुन शेतकऱ्यांनी कोणाकडे दाद मागायची?? असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली.

## अंमळनेरच्या भैरवनाथ विद्यालयाचा विद्यार्थी अभय राजगुरू बार्टीच्या दोन लक्ष रुपये शिष्यवृत्तीस पात्र







अंमळनेर । प्रतिनिधी

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित भैरवनाथ विद्यालय अंमळनेर तालुका पाटोदा जिल्हा बीड येथील शाळेचा १००% निकाल लागला असून या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दहावी बोर्ड परीक्षेत एकूण ६४ विद्यार्थी परिशिष्ट झाले पैकी ३६ विद्यार्थी विशेष प्राविण्य सह उत्तीर्ण झाले प्रथम श्रेणीत २१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत ०७ विद्यार्थी या गुणांप्रमाणे उज्वल हे संपादन केले प्रथम क्रमांक अभय आप्पासाहेब राजगुरू ९१ % घेऊन प्रथम क्रमांक पटकावला .द्वितीय क्रमांक अंजली भाऊसाहेब घाडगे ८८.८०% तृतीय क्रमांक जायद इनुस पठाण ८८.६०% प्रिया भाऊसाहेब धनवडे ८८.२०% तसेच स्नेहल गोरख मिसाळ, सोमनाथ अंकुश पुरी, सिद्धी अंकुश शेळके, शुभम सुरेश नलावडे ,अगस्ती दिनकर नरवडे ,संध्या विश्वास मस्के, हे विद्यार्थी विशेष गुण घेऊन उत्तीर्ण झाले संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे साहेब ,सिनेट सदस्य अजय दादा धोंडे, प्रशासनाधिकारी बोंदार्डे साहेब ,डॉ. डी बी राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे,संजय शेंडे ,मु.अ. वैष्णव शिंदे,प्राचार्य चौधरी, उपप्राचार्य बनसोडे, केंद्रप्रमुख उकांडे , सरपंच लीलावती गाडे, उपसरपंच सौ.पोकळे ताई इत्यादींनी अभिनंदन केले. तसेच वर्गशिक्षक श्री निकाळजे,अनारसे, देशमुख मॅडम, पन्हाळकर , कुलांगे , शेळके,मिसाळ,पालवे मॅडम ,नरेवाड , सानप मामा, शेंडे मामा, धोंडे, खांडेकर, इत्यादी कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या...

## भामेश्वर विद्यालयाचा दहावीचा निकाल सर्वात पुढे

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील भामेश्वर विद्यालय पाटोदा या विद्यालयाचा फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये झालेल्या इयत्ता दहावीचा निकाल दि.१३ मे २०२५ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर झाला. विद्यालयाचा एकूण निकाल १००% लागलेला आहे. परीक्षेसाठी एकूण १०८ विद्यार्थी समाविष्ट झाले होते पैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाचा गोषवारा खालील प्रमाणे –

१) ९० %पेक्षा जास्त विद्यार्थी= २७ विद्यार्थी

२)७५–८९% = ६० विद्यार्थी, ३) ६०–७४% = १८ विद्यार्थी, ४)५०–५९% = ३ विद्यार्थी, सर्व विद्यार्थ्यांमधून सर्वप्रथम – पवार मनोज शहादेव (९८.४०%), द्वितीय –शिंदे सृष्टी भास्कर (९८%) , तृतीय– ढवळे श्रुती प्रताप (९६.२०%) व गुणाानुक्रमे गोरे श्रवण श्रीकृष्ण (९५.८०%) , पवार स्वरूप अरुण (९४.८०%) , नाईकवाडे सारंग प्रशांत (९४.८०%) , कीर्तने ज्ञानेश्वरी कैलास (९४.४०%) , लऊळ समर्थ राहुल (९४.४०%) , घुमरे शिवेंद्र अनिल (९४%) , वाघ गौरव माणिक (९३.८०%) , पवने साक्षी अनिल (९३.६०%) , मोहोळकर प्रणव गणेश (९३%) , लामजे ओम सतीश(९२.६०%) , नाईकवाडे चंद्रकांत हनुमंत (९२.४०%) , सय्यद हुजेफ नूर (९२.४०%) , हात्ते सार्थक गणेश (९२%) , जाधव श्रेयश सतीश (९१.६०%) , बनसोडे चैतन्य दत्तात्रय(९०.८०%) , हुले शुभम रामदास (९०.८०%) , जाधव अलोक धनराज (९०.८०%) , घुमरे शुभम संतोष (९०.८०%) , डांभे ओम रामदास (९०.६०%) , कश्यप आशु अनिल (९०.६०%) , घोडके समर्थ बाबासाहेब (९०.४०%) , वीर संघर्ष रामहरी (९०.४०%) , गवळी हर्षल ईश्वर (९०.२०%) , डिडुळ यश राजू (९०%) असे गुण प्राप्त केलेले आहेत. वरील यशाचे मानकरी सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच पालकवर्ग व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.हरिभगत के . बी . यांनी अभिनंदन केले. या यशाचा डंका पाटोदा व पाटोदा पंचक्रोशीत होत आहे व भामेश्वर विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम आहे अशी सर्वत्र चर्चा होत आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे बुधवारी मोफत किडनी विकार शिबिर

## अंगावर सुज येणे, लघवी कमी / लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस इ. उपचार. किडनी ट्रान्स्प्लांट विषयक मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे बुधवार दि २१ मे रोजी १२ ते २ किडनी आजारावरती शिबिर अंगावर सुज येणे, लघवी कमी / लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस इ. उपचार. किडनी ट्रान्स्प्लांट विषयक मार्गदर्शन. व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी किडनी आजार असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.

या शिबीरात डायलेसिस असणार्या गरजू रुग्णांना महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत

डायलेसिस मोफत केले जातील. शिबीरात तज्ञ डॉक्टर्स – नेफ्रॉलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत.

*वैशिष्ट्ये:– सुसज्ज फ्रेसेनियस कंपनीचे डायलिसिस युनिट उपचारांसाठी आरामदायक आणि स्वच्छ वातावरण प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. नेफ्रोलॉजिस्ट, परिचारिका आणि तंत्रज्ञांची आमची टीम डायलिसिस काळजीमध्ये अत्यंत कुशल आणि अनुभवी आहे, जे चोवीस तास सुरक्षित आणि प्रभावी उपचारांची खात्री देते.आम्ही प्रत्येक रुग्णाच्या विशिष्ट गरजा आणि प्राधान्ये पूर्ण करण्यासाठी वैयक्तिकृत काळजी, टेलरिंग उपचार योजनांना प्राधान्य देतो.आम्ही विविध जीवनशैली आणि वचनबद्धता सामावून घेण्यासाठी लवचिक वेळापत्रक पर्याय ऑफर करतो.आम्ही रुग्णांना किडनी आरोग्य आणि डायलिसीस बद्दल ज्ञान देऊन सक्षम करतो, त्यांना त्यांच्या काळजीबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करतो.चॅरिटेबल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट असल्याने आम्ही अतिशय वाजवी शुल्कासह डायलिसिस सेवा देतो. बहुतेक रुग्णांना सवलत किंवा मोफत डायलिसिस उपचाराची सुविधा देखील दिली जाते. आज पर्यंत हजारो डायलेसिस असणार्यात रुग्णांवर उपचार करून असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. किडनी विकार शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ ० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.बुधवार दि २१ मे रोजी १२ ते २ या वेळेत मोफत किडनी विकार शिबिर , अहमदनगर येथील तज्ञ डॉ. नेफ्रॉलॉजिस्ट गोविंद कासट व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोशीतील किडनी विकार रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीडचे विश्वस्त व समस्त जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

### जाहीर प्रगटन

**मा.श्री आर.जी. बागडे साहेब ५ वे सह.दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ८२४/२०२५**

सुशीला विरुध्द निरंक

अर्जदार १. श्रीमती सुशीला भ्र.रामराव रोहिटे, वय ८० वर्षे, धंदा–घरकाम, रा. शासकीय दूध डेअरी समोर, कांतांगळे नगर, बार्शी रोड, बीड २. दिपक पि. रामराव रोहिटे, वय ४० वर्षे धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे. ३. सौ. अपर्णा भ्र.हनुमंत साबळे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम रा. कर्झणी, ता.जि.बीड., ४. सुषमा भ्र. परमेश्वर इंगोले, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. शिवतेज हाऊसिंग सोसायटी, पुणे शहर ता. जि. पुणे ५. रेश्मा भ्र. आदिनाथ काटकर, वय ४६ वर्षे, धंदा नौकरी, रा. कृषी कॉलनी, पालवन चौक बीड.

मागणी बॉम्बे रेग्यलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे यांचा मृत्यु दिनांक ०९/०२/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०५/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३/०६/२०२५ आहे.

**स्वाक्षरित**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड**

# जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धेतील विजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील धम्मचक्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मिरवणूक व विविध स्पर्धेतील विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

धम्मचक्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धेचे परीक्षण करण्यात आले. मिरवणूक स्पर्धेचे परीक्षक म्हणून दत्ता देवकते, मनेष गोरे, बाळासाहेब म्हस्के, पिराजी कुसळे यांच्या सोबतच संस्थेचे सदस्य गंगाराम ओहाळ, मनात भोसले यांनी अंबाजोगाईतील सर्व जयंती मंडळांना स्वतः भेट देऊन परीक्षण केले होते. त्यामध्ये अंबाजोगाई शहरातील सिद्धार्थनगर जयंती उत्सव समिती (प्रथम





क्रमांक) तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर नवीन मोरेवाडी (द्वितीय क्रमांक), संत कबीरनगर (तृतीय क्रमांक) हे संघ विजेते ठरले. सामुहिक महिला गट टिपरी – रमाई चौक (प्रथम क्रमांक), वैयक्तिक नृत्य लहान गट – वेदा कृष्णा वाघमारे (प्रथम क्रमांक), तसेच अंबाजोगाई शहरातील देखाव्यांमध्ये भीमनगर, परळी वेस (प्रथम क्रमांक), डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर नवीन मोरेवाडी (द्वितीय क्रमांक) यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी संत कबीरनगर भागातील काही विद्यार्थी विविध सरकारी सेवेमध्ये रूजू झाले. त्यापैकी १) सुजाता प्रकाश कसबे (इन्कम टॅक्स ऑफिसर), २) लक्ष्मण धोत्रे (महाराष्ट्र पोलिस), ३) रत्नदीप संजय कांबळे (विद्युत सहाय्यक) या गुणवंतांचा संस्थेच्या मार्फत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयासमोरील महावितरण कार्यालयाजवळ आयोजित एका विशेष कार्यक्रमात यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार पृथ्विराज साठे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख, ज्येष्ठ नेते कॉ.बब्रुवाहन पोटभरे, आरपीआय नेते महेंद्र निकाळजे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, माजी जि.प.सदस्य पंडीत अण्णा जोगदंड, प्रवीण देशमुख, भिमराव सरवदे, संघटनेचे प्रवीण जगताप, गणेश भोसले, माजी नगरसेवक संतोष शिनगारे, माजी नगरसेवक दिनेश भराडीया, सचिन जाधव या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

## पान ६ वरून...

### खुर्शीद आलम यांचे

जागृती नसल्यामुळे त्यांना त्यांच्या हक्काचे सहुलती मिळत नाही म्हणून या गोरगरीब समाजामध्ये मिळुन मिसळून त्यांची कामे करून त्यांच्यामध्ये जनजागृती करणारे कसे सर्व परिचित बीड नगरपरिषदेचे माजी सभापती खुर्शीद आलम यांची निवड हिंदू मुस्लिम ओबीसी विमुक्त भटके जाती जमाती संघटनेचे अध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव साहेब यांनी सर्वानुमते बिनविरोध निवड केली आहे, या निमित्ताने ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशन या सामाजिक संघटनेच्या वतीने खुर्शीद आलम यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ओबीसी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख जाकेर साहेब,शहराध्यक्ष खालेद साहेब,शेख फिरोज भाई,मोमीन शाफे,सैय्यद नबिलउजमा,हकीम मन्यार,सलाम सेठ,वजीर आत्तार,एजाज इनामदार, नायाजी सर,शेख मोहसीन,अब्बास इनामदार, रफिक कुरेशी यांच्यासह सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते,

### जय भवानी महाविद्यालयात

महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री शहाजी लाऊड श्री कुणाल काळे श्री दत्ता चादर शिंदे काका यांनी सहकार्य केले

### अशोक माध्यमिक व उच्च

विद्यालयाचा ९४.०० निकाल लागला असून विद्यालयामधून कु.गायकवाड धनश्री सचिन ९१.२० गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर कु.मुंडे पायल लक्ष्मण ९०.०० % गुण घेऊन व्दितीय क्रमांक पटकावला व कु.आजबे वेदिका जगन्नाथ ८८.२० % गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे तसेच विद्यालयाचे ४० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थापक, अध्यक्ष मा.श्री.सर्जेरावजी काळे सर व युवा नेतृत्व मा.ॲड.आनंद भैय्या काळे तसेच प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री. सावंत बी.आर.,उपप्राचार्य पटाईत सर,श्री.आवारे सर,श्री.सुशांत काळे सर, श्री.खळगे सर,श्री.डोंगरे सर, श्री.चोरमले सर,श्री.कोळपे सर,श्रीमती सावंत मॅडम,श्रीमती महानोर मॅडम, श्रीमती पांचाळ मॅडम,श्रीमती बोत्रे मॅडम यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर व प्राध्यापक यांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### अंबाजोगाईत ‘तिरंगा रॅली’स

सोहळ्यात रूपांतरित झाली. शेकडो नागरिक, विविध सामाजिक संस्था, रिटायर माजी सैनिक, युवक संघटना, विद्यार्थी, महिला व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रॅलीदरम्यान ‘जय हिंद’, ‘भारत माता की जय’ आणि ‘भारतीय लष्कर अमर रहे’ अशा घोषणांनी संपूर्ण शहर देशभक्तीच्या रंगात न्हालं.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याआधी एका पत्रकार परिषदेत ‘ऑपरेशन सिंदूर’मुळे भारताने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, देशाच्या सुरक्षिततेशी कोणीही खेळ करू शकत नाही. लष्कराच्या धाडसी कारवाईमुळे भारताचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला असून, त्यांचा सन्मान करण्यासाठी राज्यभर विविध ठिकाणी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येईल, असे वक्तव्य केले होते. अंबाजोगाईतील रॅली हे त्याचेच एक उदाहरण ठरले.या रॅलीदरम्यान पोलिस प्रशासनाकडून योग्य बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण मार्गात वाहतूक व्यवस्था सुरळीत राखण्यात आली. शहरातील व्यापाऱ्यांनी देखील रॅलीला पाठिंबा देत काही काळासाठी दुकाने बंद ठेवून सहभाग नोंदवला.देशाच्या सुरक्षेसाठी झुंजणाऱ्या जवानांना मानवंदना देण्यासाठी अंबाजोगाईच्या जनतेनं दाखवलेला उत्साह निश्चितच प्रेरणादायक ठरला आहे. या माध्यमातून शहरात देशभक्तीचा नवा सळसळता ज्वालामुखी पेटलेला दिसला.

### दहावी, बारावीतील गुणवंत

मान्यवर ग्रामस्थांनी दहावी बारावी परीक्षेमध्ये उत्कृष्ट गुण मिळवून पास झालेल्या विद्यार्थिनींचे शाल श्रीफळ व पेढा भरवून कौतुक व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा गुणवंत विद्यार्थ्यांचा झालेला सन्मान येत्या काळात विद्यार्थ्यांसाठी नवीन प्रेरणा आणि ऊर्जा देण्यात ठरेल असा विश्वास सामाजिक कार्यकर्ते महादेव कोहोक यांनी आयोजित सत्कार प्रसंगी व्यक्त केला आहे.

### राजनंदिनी पाटील हिचे

जोशी,दहावी विभाग प्रमुख तथा सहशिक्षिका कल्पना जवळगावकर, ज्ञानोबा सावंत,अश्विन पाटील,किरण पाटील, शशिकांत गोरटे,अरुण पाटील,प्रकाश गोरटे, शैलेश कंगळे संस्कृतच्या गाड्या अभ्यासक सौ सुचिता कंगळे,नारायण काकडे नारायण,पत्रकार अविनाश मुडेगावकर, प्रशांत बर्दापूरकर, बाळासाहेब गाठाळ, जेष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, जगन सरवदे, दादासाहेब कसबे राजवीर पाटील, बाळासाहेब चिल्लरगे,संजय बर्दापूरकर, सुनील मुंदडा, सुनील चव्हाण डॉ.अनिल मस्के ,उप अधिष्ठाता डॉ.राजेश कचरे,डॉ विलास शिंदे, नासेर पठाण सौ.संगीता सावंत,सूष्टी शिंदे यांच्या सह इतर मान्यवरांनी राजनंदनीचे कौतुक केले आहे.

### एकलव्य माध्यमिक विद्यालय

सचिव श्री.अजितदादा पाखरे,श्री शिवराज दादा पाखरे,श्री.हांगे सर,शाळेचे प्राचार्य श्री.कानडे साहेब,बोंदर सर,आघाव सर,साखरे सर,चोले सर,चव्हाण डी.टी सर,सानप सर,चव्हाण एस बी सर,आंधळे सर,राऊत सर,चंदनशिव सर,लव्हाळे सर,गवारे सर,यादव सर,ठोंबरे सर,नेकनुरकर सर,सौ.देशमुख मॅडम,सौ.तोगे मॅडम,बालू बप्पा,गुरव मामा,मस्के,गावातील सरपंच,उपसरपंच,सदस्य,सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन,सदस्य,आजी_माजी, शिक्षण प्रेमी नागरिक व पालक वर्गाने अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

### शालांत परीक्षेत श्री राजर्षी

सोसायटी चेअरमन, ग्रामस्थ, पालक, शाळेचे माजी विद्यार्थी, युवक यांनी शाळेचे मुख्याध्यापक, विद्यार्थ्यांचे पालकांचे, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन केले. संस्थेचे सचिव शिवाजीराव चन्नागिरे व शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत सोमवंशी यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विशेष अभिनंदन करीत सांगितले की, हे यश म्हणजे संपूर्ण शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे फलित आहे. आमची शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कटीबद्ध आहे आणि हे यश त्याचाच पुरावा आहे. असे दोन्ही मान्यवरांनी सांगितले. तर या यशाबद्दल पालकवर्ग आणि ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांचे व शाळेचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. श्री राजर्षी शाहू विद्यालय ही शाळा भविष्यात ही अशाच प्रकारे विद्यार्थ्यांना घडवित राहील असा विश्वास यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

### महाराणी ताराबाई विद्यालयाच्या

केले त्यापैकी ९६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर ७९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत ३८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत व ७ विद्यार्थी पास झाले आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार श्री.केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय आंधळे,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,१०वी बोर्डाचे परीक्षा विभाग प्रमुख श्री.ठोंबरे सर,वर्गशिक्षक श्री.गिलबिले सर ,श्री.समर्थ सर,श्रीमती फलके मॅडम,श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,श्री.कुलकर्णी सर,श्री.घोळवे सर,श्री.चोले सर सर्व विषय शिक्षक यांच्यासह विद्यालयातील शिक्षक–शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षक–शिक्षिकांचे कौतुक व अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

cmyk

# मराठवाड्यातील दोन जिल्ह्यात आणखी ५ सौर ऊर्जा प्रकल्प सुरू

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यांत गेल्या महिनाभरात ५ सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २ व जालना जिल्ह्यातील ३ प्रकल्पांचा यात समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडळात आतापर्यंत १५ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्यातून २२ हजार ७४० कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. एकूण १६ हजार मेगावॉट क्षमतेचे सर्व प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होऊन राज्यात शेतीसाठी पूर्णपणे सौर ऊर्जेवर निर्माण झालेल्या विजेचा पुरवठा होईल. यासाठी स्वतंत्र कृषी वीजनिर्मिती कंपनी स्थापन करण्यात आली आहे. आतापर्यंत योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ८ प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्यातून ११ हजार ७२५ कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा होत आहे. जालना जिल्ह्यात कार्यान्वित झालेल्या ७ प्रकल्पांतून ११ हजार १५ शेतकऱ्यांना दिवसा विजेचा लाभ होत आहे. महावितरण उपकेंद्राच्या ५ किमी परिघातील जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यातून निर्माण होणारी



वीज महावितरणच्या उपकेंद्रांतील फीडरद्वारे परिसरातील कृषिपंपांना दिवसा पुरवण्यात येत असल्याची माहिती छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी दिली.

जिल्हानिहाय प्रकल्प क्षमता व कार्यान्वितता


छत्रपती संभाजीनगर :

वैजापूर तालुक्यातील लोणी येथील १० मेगावॉटचा प्रकल्प १० एप्रिल रोजी कार्यान्वित झाला. त्यातून लोणी, वाकला, चिकटगाव, नायगव्हाण, खरज, तलवाडा व बाभूळतेल गावातील १६६५ कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा होत आहे. फुलंब्री तालुक्यातील गेवराई गुंगी येथे ५ मेगावॉटचा प्रकल्प २९ एप्रिल कार्यान्वित झाला आहे. त्यातून गेवराई गुंगी, रिधोरा देवी, कोलते टाकळी, धानोरा व निमखेडा गावातील ८५४ कृषिपंपांना दिवसा वीज दिली जात आहे.

जालना जिल्हा :

१९ एप्रिलला भोकरदन तालुक्यातील नळणी येथील ५ मेगावॉटचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. या प्रकल्पातून नळणी बुद्रुक, नळणी खुर्द, शिंदेवाडी, नळणीवाडी, बरंजळा साबळे, गव्हाण, तोंडोळी, बानेगाव, थिगळखेडा, चांदई, खापरखेडा, ताडेगाव व ताडेगाववाडी गावातील २१३९ कृषिपंपांना दिवसा वीज दिली जात आहे. २९ एप्रिलला अंबड तालुक्यातील चंदनापुरी येथे ४ मेगावॉटचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पातून चंदनापुरी, भांबेरी, दह्याळा, चुरमापुरी व रेणापुरी गावांतील २२८० कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे. अंबड तालुक्यातील रोहिलागड येथे ५ मेगावॉटचा प्रकल्प ६ मे रोजी कार्यान्वित करण्यात आला. रोहिलागड, माहेर भायगाव, देशगव्हाण, चिकनगाव व खेडगाव येथील ९१३ कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे.

# शेतकऱ्यांना ३७२० कोटी रुपये विमा भरपाई मंजूर



खरीप हंगाम-२०२४ मध्ये पीक नुकसानीपोटी शेतकऱ्यांना एकूण ३ हजार ७२० कोटी रुपये विमा भरपाई मंजूर झाली. त्यापैकी ९ मे पर्यंत ३ हजार १२६ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. आणखी ३०७ कोटी रुपये शेतकऱ्यांना लगेच मिळणार आहेत. तर २८७ कोटी रुपये राज्य सरकारने पीकविमा कंपन्यांना विम्याचा दुसरा हप्ता दिल्यानंतर मिळणार आहेत.

शेतकऱ्यांना सध्या खरीप हंगाम-२०२४ मधील वेगवेगळ्या ट्रीगरमधून भरपाई मंजूर करण्याचे काम सुरु आहे. राज्य सरकारने आपल्या हिश्श्याचा पहिला हप्ता विमा कंपन्यांना दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून भरपाई जमा केली जात आहे. काढणीपश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई राज्याने आपला दुसरा हप्ता विमा कंपन्यांना दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल. शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणीपश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई या चार ट्रिगरमधून भरपाई मंजूर झाली आहे. शेतकऱ्यांना ९ एप्रिलपर्यंत ३ हजार ७२० कोटी रुपये भरपाई मंजूर करण्यात आली. पण राज्याने केवळ पहिला हप्ता दिल्यामुळे नियमानुसार कंपन्या स्थानिक नैसर्गिक अपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून मंजूर भरपाईच शेतकऱ्यांच्या खात्यता जमा करत आहेत.

### या दोन ट्रीगरमधून भरपाई मंजूर

३ हजार ४३३ कोटी रुपये आहे. त्यापैकी ९ एप्रिलपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात ३ हजार १२६ कोटी रुपये जमा करण्यात आले. तर ३०७ कोटी रुपये जमा करण्याचे काम सुरु आहे.

# लिंबूवर्गीय फळ पिकांवरील कोळी

लिंबू, मोसंबी आणि संत्रा या लिंबूवर्गीय फळपिकांमध्ये विविध कीड-रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यात मुख्यत: खोड पोखरणारी आळी, नागअळी, मावा, काळी माशी, लेमन बटरफ्लाय, मिलीबग, फुलकिडे, फळातील रस शोषणारी फुलपाखरे तसेच कोळी किडीचा प्रादुर्भाव आढळून येतो. सध्या लिंबूवर्गीय फळपिकांवर काळी माशी व कोळी किडीचा जास्त प्रादुर्भाव दिसून येत आहे. या किडींच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे वेगवेगळ्या प्रकारे नुकसान होते. त्यामुळे वेळीच त्यावर नियंत्रणात मिळविणे आवश्यक आहे.

नुकसान :या किडीच्या प्रादुर्भावामुळे फळपिकांचे साधारणत: २० ते ५० टक्क्यांपर्यंत नुकसान होण्याची शक्यता असते. प्रौढ आणि पिल्ले अवस्था सोंडेसारखा अवयव पानामध्ये घुसवून आतील रस शोषण करतात.

लक्षणे : कोळी किडीच्या प्रादुर्भावाची लक्षणे पाने व फळांवर दिसून येतात. कीड पानाच्या मागील बाजूस राहून रस शोषण करते. त्यामुळे पानावर अत्यंत विशिष्ट प्रकारचे पांढऱ्या रंगाचे ठिपके पडतात. हे कोळी अतिशय सूक्ष्म असल्यामुळे उघड्या डोळ्यांनी दिसत नाहीत. तसेच इतर कोळी प्रमाणे हे जाळे तयार करत नाहीत, त्यामुळे प्रादुर्भावाची लक्षणे लवकर लक्षात येत नाहीत. हे कोळी फळावर हल्ला करत नाहीत. परंतु बऱ्याच वेळा फळांवर देखील अशा प्रकारची पांढरी ठिपक्यांची लक्षणे दिसतात.



जीवनक्रम : कोळी किडीच्या अंडी, अळी, प्रोटोनिम्फ, डिटोनिम्फ आणि प्रौढ अशा एकूण पाच अवस्था असतात. कोळी किडीचा संपूर्ण जीवनक्रम १२ ते २० दिवसात पूर्ण होतो. किडीची मादी सुमारे ५० ते ५५ अंडी घालते. अंडी अवस्था ५ दिवसांची असते.मादी कोळी एक किंवा समूहात ५० ते ५५ गोलाकार पिवळसर रंगाची अंडी घालते. ही अवस्था ४ ते ५ दिवसांची असते. अळी ही पहिली अवस्था अंड्यामधून निघते. या अवस्थेतील अळीला ६ पाय असतात. ती १ ते २ दिवसांची असते. अळी अवस्थेनंतर ही अवस्था सुरू होते. या अवस्थेत ८ पाय असतात. हे प्रौढ कोळी सारखे दिसतात, मात्र आकाराने लहान असतात. हे पानाच्या पेशी खातात. प्रत्येक अवस्था ही २ ते ३ दिवस राहते. शरीर अंडाकृती असते. नर आकाराने लहान, तर मादी मोठी असते. ही अवस्था १० ते २० दिवसांची असते. पानातील रस शोषण करतात.

नियंत्रणाचे उपाय : नत्रयुक्त खतांचा अति वापर टाळावा. पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. योग्य वेळेत सिंचन करावे. बागेत तणांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी. वेळीच तण नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात. पानांवर व फळांवर धूळ येणार नाही याची काळजी घ्यावी. त्यासाठी रस्त्यालगत असलेल्या लिंबूवर्गीय फळबागांभोवती कापड लावावे. जमिनीवर आच्छादन करावे. झाडांवर पाण्याची फवारणी करावी.कोळी किडीचे नियंत्रण करणाऱ्या शत्रू कोळी, ढालकिडा यांचे संवर्धन करावे. निमतेल तसेच धुरळणीद्वारे सल्फरचा वापर फायदेशीर ठरू शकतो. तत्पूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# माहिती करुन घ्या शेळ्या, मेंढ्यांमधील कोलिबॅसिलोसिस आजार

कोलिबॅसिलोसिस हा जिवाणूमुळे होणारा आजार आहे. प्रामुख्याने लहान करडे, कोकरू आणि दोन आठवड्यांपेक्षा कमी वयाच्या लहान पिल्लांना आजार होतो. तीव्र अतिसार आणि अपुरे द्रवपदार्थ सेवनामुळे जलद निर्जलीकरण होते. कोलिबॅसिलोसिस आणि विविध आजारांपासून संरक्षण होण्यासाठी नवजात पिल्लांना चीक पाजणे आवश्यक आहे. एक महिन्यापेक्षा कमी वयाच्या शेळ्या, मेंढ्यांना तीव्र अतिसार होण्याची शक्यता जास्त असते. तीव्र जुलाब होतात. या आजाराला विविध कारणे आहेत. यामध्ये प्रामुख्याने विण्याच्या कालावधीमधील प्रतिकूल हवामान परिस्थिती, लवकर दूध सोडणे, गोठ्यातील गर्दी, अस्वच्छ गोठा, कोलाई, क्लोस्ट्रिडियम कॅम्पिलोबॅक्टर किंवा साल्मोनेला जिवाणूंचे संक्रमण, क्रिप्टोस्पोरिडिया कोक्सीडिया, गिआर्डिया किंवा वर्म्स सारखे परजीवी किंवा विषाणू यांचा प्रादुर्भाव यांचा समावेश आहे.

लक्षणे : लहान करडे, कोकरांमध्ये अतिसार हे एक मृत्युदर वाढण्याचे मुख्य कारण आहे. जेव्हा मेंढ्या किंवा शेळ्यांना पोटाचे आजार होतात तेव्हा त्यांची विष्ठा मऊ पातळ आणि दुर्गंधीयुक्त बनते. कोलिबॅसिलोसिस हा जिवाणूमुळे होणारा आजार आहे. प्रामुख्याने लहान करडे, कोकरू आणि दोन आठवड्यांपेक्षा कमी वयाच्या लहान पिलांना आजार होतो. आजारी मेंढ्या आणि शेळ्यांच्या विष्ठेत कोलिबॅसिलोसिस नावाचा जिवाणू असतो. जेव्हा कोकरू/करडे या विष्ठेने दूषित अन्न किंवा पाणी खातात तेव्हा ते आजारी पडतात. सुस्त होऊन खाण्यास नकार देतात. त्यांना पातळ पांढरे-पिवळे



किंवा राखाडी रंगाचे अतिसार होतात, यास पांढरे स्कॉर्स म्हणतात. संक्रमित पिलांना नाभीसंबंधीचा दाह आणि सूज दिसून येते. तीव्र अतिसार आणि अपुरे द्रवपदार्थ सेवनामुळे जलद निर्जलीकरण होते. त्वरित उपाययोजना न केल्यास निर्जलीकरण आजाराच्या वाढीस आणि मृत्यूला कारणीभूत ठरते. घाणेरडे आणि ओलसर गोठे आजाराचा धोका वाढवू शकतात, मेंढ्या किंवा पिल्लांना वेगवेगळ्या ठिकाणी हलवणे किंवा त्यांना जास्त गर्दीमध्ये आजाराचा प्रादुर्भाव वाढू शकतो. आजारी पिल्ले निरोगी पिल्लांसोबत मिसळल्याने त्यांना कोलिबॅसिलोसिस संसर्ग होण्याची शक्यता असते.

चीक पाजणे आवश्यक : कोलिबॅसिलोसिस आणि विविध आजारांपासून संरक्षण होण्यासाठी नवजात पिल्लांना चीक पाजणे आवश्यक आहे. पिलाच्या जन्मानंतर चीक पाजला नाही तर कोलिबॅसिलोसिस होण्याची शक्यता वाढते. कारण चिकामध्ये आजार प्रतिकार क्षमता बळकट करणारे घटक असतात. पिल्लाच्या वजनाच्या १० टक्के चीक पाजणे आवश्यक आहे. चिकाच्या अति सेवनामुळे लहान करडांना पांढऱ्या रंगाच्या जुलाब होतात. त्यामुळे करडांमध्ये मृत्युदर प्रमाण वाढते.

नवजात करडांचे व्यवस्थापन : जन्मानंतर पहिल्या २४ तासांत करडांची विशेष काळजी घ्यावी लागते. या वेळी करडांना जास्त ऊर्जेची गरज असते. तसेच नवीन वातावरणातील बदलाशी जुळवून घेणे महत्त्वाचे असते. सर्वसाधारणपणे शेळी व्यायल्यानंतर तिच्या पिलास चाटून स्वच्छ व कोरडे करते. जर असे दिसून आले नाहीतर मात्र अशा करडांना कोरड्या टॉवेलने पुसून स्वच्छ करावे. जर टॉवेल उपलब्ध नसेल तर वाळलेल्या मऊ गवताचा वापर करून करडाचे शरीर कोरडे करावे. करडांचे शरीर कोरडे करताना होणाऱ्या घर्षणामुळे श्वासोच्छ्वास व्यवस्थित होण्यास मदत होते.

मृत मेंढ्या, पिलांमध्ये आजाराची लक्षणे : जिवाणू संसर्गामुळे होणाऱ्या जळजळीमुळे आतडे नेहमीपेक्षा जास्त लाल दिसते. द्रव आणि वायू जमा होणे, विशेषत: लहान आतड्यात, आतड्यांमध्ये सूज येऊ शकते. आतड्यामध्ये राखाडी ते पिवळ्या रंगाचा द्रव असू शकतो, हे आजाराचे गंभीर लक्षण आहे. यकृत आणि मूत्रपिंडांसारख्या इतर अंतर्गत अवयवांमध्ये सूज किंवा रक्तसंचय होतो.

उपचार : अँटिबायोटिक्स कोलिबॅसिलोसिसवर प्रभावीपणे उपचार करू शकतात. आजारी कोकरू आणि पिलांना डीहायड्रेशन टाळण्यासाठी पुरेसे पिण्याचे पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स पुरवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रौढ मादी मेंढ्या आणि शेळ्या यांना विण्याच्या अगोदर ६-८ आठवड्यांपूर्वी लसीकरण करावे. जेणेकरून त्यांच्या पिलांना कोलिबॅसिलोसिस आणि इतर विविध आजारांपासून संरक्षण मिळेल. लहान पिलांना स्वतंत्र कोरडा स्वच्छ गोठ्यात ठेवावे. लहान पिल्लांना मोठ्या वयाच्या शेळ्या, मेंढ्यांच्या सोबत ठेवू नये.




## महत्वाच्या घटना

१८६६ : अमेरिकेत पाच सेन्ट किंवा निकेल हे नाणे व्यवहारात आणले.
१८९९ : क्रांतिकारक बाळकृष्ण चाफेकर यांना फाशी.
१२०४ : बाल्डविन नववा पहिला लॅटिन सम्राट झाला.
१६०५ : पॉल पाचवा पोपपदी.
१९१८ : अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.
१९२० : पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.
१९२९ : हॉलिवूडच्या ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर, आर्ट्स अँड सायन्सेस या संस्थेतर्फे चित्रपटांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्मृतिचिन्ह देण्याचा पहिला समारंभ झाला. याच पारितोषिकांना पुढे ऑस्कर असे नाव पडले.
१९६९ : सोवियेत संघाचे अंतराळयान व्हेनेरा ५ शुक्रावर उतरले.
१९७५ : सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करून घेतले.
१९७५ : जुन्को ताबेई एव्हरेस्टवर चढणारी प्रथम स्त्री ठरली.
१९९३ : बचेन्द्री पालच्या नेतृत्वाखालील पहिल्या महिला भारतीय मोहिमेने सात मुलींसह अठरा गिर्यारोहकांना एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याचा मान मिळवून दिला व नवा जागतिक विक्रम नोंदविला.
१९९२ : स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.
१९९६ : भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सूत्रे हाती घेतली. मात्र आवश्यक पाठिंबा न मिळाल्यामुळे त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले.
२००० : बॅडमिंटन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच खेळांचे दूरचित्रवाणी प्रसारण सुलभ करण्यासाठी या खेळातील गेम १५ ऐवजी ७ गुणांचा करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाच्या क्वालालंपूर येथील बैठकीत घेण्यात आला. मात्र २००६ मधे हा नियम परत बदलला गेला.
२००५ : कुवेतमधे स्त्रियांना प्रथमच मतदानाचा हक्क प्राप्त झाला.
२००५ : अमेरिकन वैज्ञानिकांनी क्लोन केलेल्या मानवी भ्रूणाच्या शरीरातून स्टेम पेशी काढण्यात पहिल्यांदा यशस्वी झाले.
२००७ : निकोलाय सारकॉझी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२५ : आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १८८४)
१८३१ : मायक्रोफोन चे सहसंशोधक डेव्हिड एडवर्ड ह्यूजेस यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९००)
१८२४ : महान गणितज्ज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म
१८५७ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पटना येथील २७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष रघुनाथ मुधोळकर यांचा जन्मदिन.
१९०५ : अमेरिकन अभिनेते हेन्री फोंडा यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९८२)
१९२६ : माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिका.
१९३१ : के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्री.
१९४१ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय टक्करवादक बनामाली महाराणा यांचा जन्मदिन.
१९४४ : महाराष्त्रातील एक प्रसिध्द लोकनेते अभयसिंह राजे भोसले यांचा जन्म
१९५३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय बायोफिजिकल वैज्ञानिक प्राचार्य रामकृष्ण विजयाचार्य होसूर यांचा जन्मदिन.
१९५५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय हातमाग उद्योजक गजम अंजैया यांचा जन्मदिन.
१९७० : गॅब्रियेला सॅबाटिनी, आर्जेन्टिनाची टेनिस खेळाडू.
१९७५ : निरोशन बंदरतिलके, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : पुरंदर किल्ला लढविताना मराठेशाहीतील स्वामीनिष्ठ सरदार मुरारबाजी देशपांडे यांचे प्राणार्पण
१८३० : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १७६८)
१९२६ : महमद सहावा, शेवटचा ओस्मानी सम्राट.
१९५० : कोल्हापूर संस्थानचे दिवाण व शिक्षणमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १८७८)
१९७७ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मादीबो केएटा यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९१५)
१९९० : द मपेट्स चे जनक जिम हेनसन यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९३६)
१९९४ : माधव मनोहर, लेखक, समीक्षक.
१९९४ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक फणी मुजुमदार यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९११ फरिदपूर, बांगला देश)
२००० : माधव गोविंद काटकर, मराठी कवी.
२००८ : ओपस वन व्हाइनरी चे सहसंस्थापक रॉबर्ट मोन्डवी यांचे निधन. (जन्म: १८ जुन १९१३)
२०१४ : टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक रुसी मोदी यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९१८)

# छत्रपती संभाजीराजेंच्या स्मारकासह महापुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत अनास्था

## ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करूनही जिल्हा परिषदेतील काम रखडले ;छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी धरणे आंदोलन

बीड। प्रतिनिधी


जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराजांसह विविध महापुरुषांचे पुतळे उभारणीबाबत १५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेचा ठराव झाला. यासाठी आंदोलने आणि उपोषणेही झाली. नवीन इमारतीच्या आवारात छत्रपती संभाजीराजांचे स्मारक आणि इतर राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्याची घोषणा जिल्हा परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी केली. विशेष म्हणजे तत्कालीन पालकमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांनी १९ मार्च २०२२ रोजी पुतळे उभारणीच्या कामाचे भूमिपूजन झाले. परंतु तीन वर्षापासून अद्याप कामाला सुरुवातच झाली नाही. ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करून मागणी करणारे आणि घोषणा करणारे सत्तेत असुन तातडीने स्मारकांचे काम पूर्ण करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी आज दि.१४ मे बुधवार छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या आवारात धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात विभागीय अध्यक्ष



संभाजी ब्रिगेड राहुल वायकर,,मराठासेवक संजय गोडसे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय छावा संघटना युवराज मस्के, बीड जिल्हाध्यक्ष बुलंद छावा संघटना विठ्ठल बहिर, मराठा सेवक अशोक सुरवसे, राहुल कवठेकर, शेख मुबीन, रामनाथ खोड, पांडुरंग हराळे, रामकिसन कदम, किशोर निर्मळ,अंगद मांडवे,शाकींदर काटकर, मुरलीधर काटकर आदी सहभागी होते. कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जि.प.बीड मोमीन सय्यद शकील सय्यद यांनी आंदोलनस्थळी चर्चा करून सदरील महापुरूषांचे पुतळे बांधण्याकरीता चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नातुन तरतूद ५० लक्ष रुपये इतकी करण्यात आली असुन सदरील ईमारतीचे संरक्षण भिंत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले.जिल्हा परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच छत्रपती राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत २०१० साली झाला. त्यानंतर पुढे काहीच हालचाल झाली नाही पुढे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे ,दिवंगत लोकनेते सुंदरराव सोळुंके ,दिवंगत लोकनेत्या केशरकाकु क्षीरसागर यांच्या पुतळ्यांच्या उभारण्याची मागणी पुढे आली. त्यानंतर जिल्हा परिषदेचे नवीन प्रशासकीय इमारत उभारणीचे काम सुरू झाले.नवीन प्रशासकीय इमारतीसमोर पुतळे उभारणीसाठी छत्रपती शंभू प्रेमींनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. त्यावेळी तत्कालीन जिल्हा परिषद उपाध्यक्ष व विद्यमान खासदार बजरंग सोनवणे तत्कालीन सभापती जयसिंह सोळंके आदींनी नवीन इमारतीच्या आवारात पुतळे उभारण्याचे आश्वासने दिले होते. महापुरुषांसह लोकनेत्यांच्या पुतळ्यांची मागणी करणारे आणि याबाबत घोषणा करणारे नेते आज एकत्र राज्याच्या सत्तेत आहेत. दि. १९ मार्च २०२२ रोजी तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, मंत्री अब्दुल सत्तार, तत्कालीन उपाध्यक्ष बजरंग सोनवणे हे प्रत्यक्ष तर तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या ऑनलाइन उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आणि महापुरुषांच्या पुतळ्यांचे भुमिपूजनही पार पडले. तेव्हाही सत्तेत असलेले मंडळी आत्ताही सत्तेत आहेत. मात्र महापुरुषांच्या पुतळ्या बाबत सरकारला अनास्था का ? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे. जिल्हा परिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण करण्यापूर्वी अगोदर पुतळ्यांची उभारणी व नंतरच इमारतीत कारभार अशी भूमिका घेत शंभू प्रेमींनी आंदोलने केली होती. दि.१६ जानेवारी २०२३ रोजी डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मावळ्यांच्या वेशभूषेत लक्ष्यवेधी आंदोलन केल्यानंतर तत्कालीन सिईओ अजित पवार यांनी चबुत-यासाठी ५ लक्ष रुपये व फेब्रुवारी २०२३ अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असुन संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करून स्मारकांचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते.परंतु पुढे काहीच हालचाल नाही.आज आंदोलन स्थळी कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ मोमीन सय्यद शकील अहमद यांनी जिल्हा परिषद बीड येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.शासन निर्णय क्र.जिपई-२०२२/पत्र.क्र.१०/बां.-४ बांधकाम भवन मुंबई दि.२४.०२.२०२५ अन्वये अंदाजपत्रके रक्कम ३५,५७,५७,५२२ मंजुरी मिळाली असुन सदरील इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाकरिता ३५ नुसार मा. अधीक्षक अभियंता सा .बां.मंडळ धाराशिव यांची मंजुरी घेऊन पुढील काम करण्यात येईल. व तसेच सदरील महापुरुषांचे पुतळे बांधण्याकरीता चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ जिल्हा परिषद उत्पन्नामधून तरतूद ५० लक्ष ईतकी करण्यात आलेली आहे. तरी सदर इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढे ती योग्य ती कारवाई करण्यात येईल असे लेखी दिले आहे. त्यामुळे एकंदरीतच पुतळे उभारण्याच्या फायलीचा प्रवास संथ असुन शासन आणि प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यापैकी कोणालाही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येते.


## थोडक्यात

### अभिषेक दुधाळचे यश



बीड : येथील वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय दुधाळ यांचा मुलगा चि.अभिषेक दुधाळ या विद्यार्थ्याने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९५.६०% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय या विद्यार्थ्याला मराठी विषयात ८९, हिंदी ९३ इंग्रजी ९१, गणित ९६, विज्ञान ९८ तर सामाजिक शास्त्रात १०० पैकी १०० गुण मिळवून एकूण ५०० पैकी ४७८ गुण मिळवून घवघवीत यश मिळविले आहे. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल सर्वत्र कौतूक होत आहे.

### सार्थक बहीरचे यश



बीड: महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून प्रगती विद्यालयाचा विद्यार्थी चि.बहीर सार्थक सतीश या विद्यार्थ्याने ५०० पैकी ४७४ गुण मिळवून घवघवीत यश मिळविले आहे. दहावीच्या परीक्षेत चि.सार्थक सतीश बहीर या विद्यार्थ्याने संस्कृत विषयात ९०, गणित ९४, सामाजिकशास्त्र ९५, विज्ञान ९७ तर इंग्रजी विषयात १०० पैकी ९८ गुण मिळवून या विषयात शाळेतून त्याला सर्वाधिक गुण मिळाले, एकूण ९४.८०% गुण मिळविले. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.

### प्रियदर्शनी मुंडेचे यश



बीड : बीड येथील मुळ रहिवाशी व पुणे येथील पीआयसीटी मॉडेल स्कुलची विद्यार्थीनी प्रियदर्शनी महादेव मुंडे हीने दहावी परिक्षेत ९८.८० टक्के गुण मिळवले आहेत. प्रियदर्शनी मुंडे विद्यालयातून तिसर्या क्रमांकावर आहे. तिच्या या यशाबद्दल शिक्षकवृंदांसह पालक, नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

## शेतकऱ्यांना केवळ डिएपी वरच अवलंबून न राहता पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सद्या पेरणीला सुरुवात झाली असून डिएपी खताची शेक-यांकडून जास्त मागणी असून डिएपी खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत यासाठी शेतक-यांनी डिएपी खते वापरावीत.

डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डी ए पी खतानंतर एस एस पी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टिएसपी या खता मध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरिप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.




केज : तालुक्यातील काळेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते रेवन गायकवाड हे गेल्या अनेक वर्षापासून आपला वाढदिवस अनाथ, निराधारांसोबत साजरा करत आहेत. यावीवर्षी त्यांनी वाढदिवसानिमित्त कामधेनु वृद्धाश्रम कोळवाडी, आनंतग्राम अनाथ आश्रम, पाली व आपला परिवार वृद्धाश्रम कळसंबर येथे फळवाटप करून अनाथांसोबत आपला वाढदिवस साजरा केला.

## पाथर्डीत १९९६ च्या १० वी बॅचचे भव्य स्नेहसंमेलन

### १५० माजी विद्यार्थी व २४ शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग



पाथर्डी । प्रतिनिधी

श्रीतिलोक जैन विद्यालय, पाथर्डी येथे ११ मे रोजी १९९६ च्या १० वी बॅचचे भव्य स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. पाथर्डी तालुक्यातील आतापर्यंतचे हे सर्वात मोठे स्नेहसंमेलन ठरले असून यामध्ये जवळपास १५० माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी व २४ माजी शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. कार्यक्रमास संस्थेचे सचिव मा. श्री सतीशजी गुगले, प्राचार्य मा. श्री अशोकजी दौंड, जेष्ठ निवृत्त शिक्षक श्री सुभाषलालजी खाबिया, थोरात मॅडम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश सानप, महेश बाहेती, भारत भडके, संजय शेटे, तात्यासाहेब करडभाजे, संदीप बडे, अरविंद खेडकर, हरीभाऊ वायकर, महेश इजारे, सारिका उरणकर, नीता आव्हाड, दिप्ती बाहेती, रेखा डाळींबकर व मनिषा वाळके यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरीभाऊ वायकर व नीता आव्हाड यांनी केले. प्रस्तावना महेश बाहेती, अध्यक्षीय सूचना भारत भडके, अनुमोदन सारिका उरणकर यांनी तर आभार संजय शेटे यांनी मानले. व्यासपीठाचे नियोजन महेश सानप, जेवण व्यवस्था पंकज मुनोत, सत्कार अरविंद खेडकर, स्वागत रघुनाथ शिवणकर, अतुल टकले व तनवीर पठाण यांनी पाहिले. तर एकंदर व्यवस्था डॉ सचिन लोखंडे यांनी सुरळीत पार पाडली. या संस्मरणीय स्नेहसंमेलनाने सर्वांना आपल्या शाळेच्या आठवणीत पुन्हा एकदा रंगून टाकले.

# जिल्ह्यातील विविध शाळांनी राखली दहावी परीक्षेत यशाची परंपरा

### कामखेडा विद्यालयाचा दहावीचा निकाल ९६.८७%

नवगण राजुरी : महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कामखेडा विद्यालयाचा शेकडा निकाल ९६.८७% एवढा लागला आहे. कामखेडा विद्यालयातून दहावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्यात १६, प्रथम श्रेणीत ११, द्वितीय श्रेणीत ०४ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शाळेतून गुणानुक्रमे प्रथम कु.मस्के रसिका रंजीत ८८.४०%, द्वितीय चि.सय्यद अबुजर जावेद ८४.६०%, तृतीय चि.ढोले अविनाश बाबुराव ८४.२०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, कामखेडा विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कुर्हे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### पिंपळवाडी विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

नवगण राजुरी : महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्चमध्ये घेण्यात आलेल्या शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून पिंपळवाडी विद्यालयाचा शेकडा निकाल १००% इतका लागला असून या शाळेने यावर्षी पण निकालाची परंपरा कायम राखली आहे. पिंपळवाडी विद्यालयातून दहावीच्या परीक्षेत ९५ पैकी ९५ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शाळेचा शेकडा निकाल १००% लागला असून विशेष प्राविण्यात ८१, प्रथम श्रेणीत १३, द्वितीय श्रेणीत ०१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेतून गुणानुक्रमे प्रथम चि.तुपे राहूल रमेश ९५.८०%, द्वितीय कु.अनपट पुजा बाळासाहेब ९५.००%, तृतीय कु.डोके दिव्या अजिनाथ ९४.८०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, पिंपळवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप जगताप, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### तांदळेश्वर विद्यालयाचा निकाल शंभर टक्के

बीड : नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेचा निकाल दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शंभर टक्के लागला आहे. नवगण शिक्षण संस्थेचे सहसचिव युवा नेते डॉ योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ सारिका ताई क्षीरसागर यांनी सर्व विद्यार्थी व पालकांचे विशेष अभिनंदन केले आहे .त्याचबरोबर नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष आदरणीय प्राचार्य दीपाताई क्षीरसागर मॅडम यांनीही प्रथम द्वितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांबरोबर सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व समाधान व्यक्त केले.संस्था प्रशासकीय अधिकारी देशमाने सर व गुट्टे सर यांनीही सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या मुख्याध्यापक डाके सर यांनीही सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.सन २०२४,२५ या वर्षी या निकालामध्ये प्रथम क्रमांक विद्यार्थिनी भागडे रोहिणी रामहरी ९४.४०% गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे. कळेकर कार्तिक अशोक या विद्यार्थ्यांनी ९३.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे त्याचबरोबर तृतीय क्रमांक कु वाघमारे नेहा सखाराम या विद्यार्थिनीने ९३% घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे कू खोसे अमृता महादेव या विद्यार्थिनीने ९२ टक्के मिळवलेले आहेत. टेकडे मयुरी या विद्यार्थिनीने ९२ टक्के गुण घेतले आहेत, उखानडे गणेश वाघमारे संदीप या विद्यार्थ्यांस ९२टक्के ,जगताप अंकिता प्रभाकर ९२टक्के गुण मिळवलेले असून या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. एकूण बोर्ड परीक्षेसाठी ४२ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ४० विद्यार्थी विशेष प्रावीण्य व दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.तांदळवाडी , अंधापुरी व पंचक्रोशीतून या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे मनःपूर्वक शुभेच्छा तांदळवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्याम डाके सर व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक शिक्षकेतर सर्व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### गजानन विद्यालयाने दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

नवगण राजुरी : महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवगण राजुरी या शाळेचा शेकडा निकाल ९८.९३% इतका लागला असून या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून विशेष प्राविण्यात २३२, प्रथम श्रेणीत ३८, द्वितीय श्रेणीत ०७, तृतीय श्रेणीत ०२ उत्तीर्ण होवून शेकडा निकाल ९३.९३% लागला असून यात गुणानुक्रमे प्रथम कु.दुधाळ ऋतुजा कल्याण ९६.२०%, द्वितीय कु.जमदाडे समृद्धी युवराज ९५.८०%, तृतीय चि.चाळक श्रेयश रामेश्वर ९५.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे, उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस., पर्यवेक्षक विजयकुमार दगडे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### ढेकळे विद्यालयाने शालांत परीक्षेत यशाची परंपरा राखली

शाळेचा शेकडा निकाल ९८.१९%

गेवराई : तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९८.१९% निकाल लागला असून या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेला शाळेतून १६३ पैकी ११६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले यात ३६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ११ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होवून शेकडा निकाल ९८.१९% एवढा लागला असून यात गुणानुक्रमे प्रथम कु.राऊत स्नेहा कृष्णा ९५.४०%, द्वितीय कु.बजगुडे दिव्या हनुमान ९५.००% तर तृतीय चि.खाडप आदित्य विनायक ९४.४०% गुण घेऊन उत्तीर्ण झाला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, प्राचार्य थिटे ए. एस., पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल९४.२३%

बीड : शहरातील नामांकित शाळा श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालय शाळेचा निकाल ९४.२३% लागला असून त्यात विशेष प्राविण्य सह उत्तीर्ण होणारे एकूण ६० विद्यार्थी, तर प्रथम श्रेणीत २७ विद्यार्थी,आणि द्वितीय श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतील एकूण निकालात याही वर्षी मुलींनी सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. शाळेचा एकूण निकाल याप्रमाणे आहे.खोटे राजनंदिनी शिवराम ९४.८०%, चव्हाण तेजस्विनी सिद्धेश्वर ९४.२०%, मुसळे सचिन आत्माराम ९३.८०%, कोरडे ओम रामेश्वर ९३.२०%, राऊत अजय शंकर ९२.९०%, वरपे सिद्धी आसाराम ९१.२०%, राऊत अभय शंकर ९०.६०%,उफाडे अभिराज विकास ९०.४०%, साबळे हर्षवर्धन गंगाधर ९०.४०%, खांडेकर मनाली बाळू ९०.००%, दामुर्डे दक्ष शाम ९०.००%, राठोड सुरज रोहिदास ८९.४०%,वाणी श्वेता श्रीराम ८९.४०%, चव्हाण अश्वित रमेश ८९.४०%, पैठणे अस्मित पांडुरंग ८९.००%या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री.आगळे,संस्थेचे सचिव श्री. अजय जाहेर पाटील, संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. गोरकर, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुनील राऊतमारे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी अभिनंदन केले आहे.

# आष्टी एसटी महामंडळामध्ये पाच लालपरी दाखल

## आ.धस यांच्या मागणीला यश; नवीन दाखल झालेल्या पाच 'लालपरींमुळे' आष्टी आगाराला मिळेल ऊर्जा -नगराध्यक्ष जिया बेग

आष्टी । प्रतिनिधी

राज्य मार्ग परिवहन महामंडळ आष्टी आगाराचे दररोजचे सात ते आठ लाख रुपये लाख उत्पन्न असूनही आष्टी आगारातील अर्ध्याहून अधिक बस दहा वर्षाच्या पुढच्या असून बस बसेस या वय संपलेल्या असूनही सेवेत आहेत त्यामुळे नविन बस नसल्यामुळे लांब पल्ल्यांच्या बस सेवा सुरू करता येत नव्हत्या त्यामुळे प्रवाशांची होणारी हेळसांड पाहता आ. सुरेश धस यांनी परिवहन मंत्री आणि महाव्यवस्थापक यांच्याकडे सतत पाठपुरावा त्यामुळे आष्टी आगाराच्या ताफ्यात पाच नवीन लाल परी बसेस आष्टी आगारात दाखल झाल्या आहेत त्यामुळे आगाराचा नवीन ऊर्जा मिळणार आहे असे प्रतिपादन आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले आष्टी येथील परिवहन महामंडळ आगारामध्ये नवीन पाच लालपरी बसेस दाखल झाल्या आहेत त्यांचे स्वागत करताना ते बोलत होते यावेळी वाहतूक नियंत्रक हर्षद गुगळे मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट चे उपाध्यक्ष गणेश नाना शिंदे नगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,खंडू जाधव,अजित मुळे,नगरसेवक ज्ञानदेव राऊत,प्रवीण कदम,शमशोद्दीन, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक श्याम वाल्हेकर,आष्टी तालुका पत्रकार संघ अध्यक्ष प्रविण पोकळे,पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार रघुनाथ कर्डीले, पत्रकार गणेश दळवी,पत्रकार सचिन रानडे,आगार व्यवस्थापक चोथमल,वाहक सचिन काळे,मुख्तार तांबोळी,के.जी.गव्हाणे,राजेंद्र बांगर,रघुनाथ ससाणे,शरद झांबरे,बाबू कुरेशी आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना जिया बेग म्हणाले आमदार सुरेश धस यांनी आष्टीच्या आगाराकडे सतत लक्ष दिलेले आहे मध्यंतरी त्यांनी स्वखर्चातून टायर चेंज मशीन आगारासाठी भेट दिले आहे आता या नवीन बसेस आल्यामुळे लांब पल्ल्यांच्या प्रवासासाठी जाणाऱ्या प्रवाशांची हेळसांड थांबेल असा विश्वास व्यक्त केला.

### गाड्यांचे आगमन आणि उत्साही स्वागत

आष्टी आगारात आज दुपारपर्यंत बीएस-६ प्रकारच्या पाच नव्या गाड्या दाखल झाल्या असून,या गाड्यांच्या आगमना नंतर आष्टीकर नागरिक व प्रवाशांच्या वतीने नवीन लाल पऱ्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.यावेळी या पाच ही लालपरींची आष्टी शहरातून फेरी आयोजित करण्यात आली.

आष्टीच्या आगारातील निम्म्याहून अधिक बसेस जुन्या झाल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याच्या तक्रारी येत असल्यामुळे आ.सुरेश धस यांनी परिवहन मंत्री, महाव्यवस्थापक या महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधल्यानंतर एसटी महामंडळाने तातडीने हालचाली सुरू केल्या.आणि आष्टी आगारासाठी अत्याधुनिक अशा पाच नवीन बीएस-६ गाड्या आज गुरुवारी (१५ मे) दुपारी आगारात दाखल झाल्या या पाच लाल परी बसेसच्या स्वागत करण्यात आले तर प्रवाशी चालक-वाहक व आगारातील कर्मचारी यांनी आ.सुरेश धस यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

# खुर्शीद आलम यांचा ऑल इंडिया ओबीसी संघटनेच्या वतीने सत्कार

## हिंदू मुस्लिम ओबीसी एस.सी.एस.टी.वि.जी.एन.टी.शहराध्यक्षपदी निवड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये हिंदू आणि मुस्लिम समाजाच्या विविध अनेक पोट जाती जमाती असुन यामध्ये हिंदू मुस्लिम दोन्ही समाजांमध्ये ओ.बी.सी.सह भटके विमुक्त जाती जमाती आहेत ज्यांना सरकारने आर्थिक व सामाजिक दृष्ट्या प्रबळ करण्यासाठी शैक्षणिक, उद्द्योग, नौकरी, राजकीय क्षेत्रासह इतर अनेक क्षेत्रांत सहुलती दिलेल्या आहेत पण लोकांत

◀◀ पान ३ वर





# जय भवानी महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा. पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे सर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे म्हणून विज्ञान विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक बाळासाहेब जोशी प्राध्यापक शिवाजीराव भोरे श्री भागवतराव जाधव प्राध्यापक डॉ लोखंडी उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी

◀◀ पान ३ वर

# अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचाळा शाळेचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९४ टक्के

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील,अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने फेब्रुवारी,मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेच्या निकाल ९४.०० लागला असून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा शाळेने कायम ठेवली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य



## मुलींनी परीक्षेत मारली बाजी

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी फेब्रुवारी,मार्च-२०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार दि. १३ मे २०२५ रोजी मंडळाचे अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील,अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक

◀◀ पान ३ वर

# मुख्य रस्त्यावरील सिसीटिव्ही खांबासह गायब

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पाण्याची टाकी मोरेवाडी ते लोखंडी सावरगाव या मुख्य रस्त्यालगत असलेल्या जयभिमनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर बसवलेला सिसीटिव्हीसह तिचा खांब गायब झाल्याचे दिसून येत आहे. खांबासह सिसीटिव्ही गायब झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मुख्य रस्त्यावर होत असलेले अपघात तसेच चोऱ्या रोकण्यासाठी शहरातील महत्याच्या ठिकाणी सिसीटिव्ही बसवण्यात आले आहेत. पाण्याची टाकी मोरेवाडी ते लोखंडी सावरगाव या मुख्य रस्त्यावर असलेल्या जयभिमनगर येथे जाणाऱ्या रस्त्यावर सिसीटिव्ही व त्यासाठी लागणारा खांब तीन महिन्यापुर्वी बसवण्यात आला होता. या सिसीटिव्हीमुळे रस्त्यावरील हालचाली व होणाऱ्या लक्षात येत होत्या. मागील दोन दिवसापुर्वी बसवलेले सिसीटिव्ही व तीचा खांब गायब झाल्याचे नागरीकांच्या लक्षात आले. दरम्यान हा सिसीटिव्ही कोणी चोरी केला की काढून नेला याचे गुढ कायम आहे. याठिकाणी सिसीटिव्ही बसवावा अशी मागणी होत आहे.



मागील तीन महिन्यापासून या रस्त्यावर सिसीटिव्ही कार्यरत होता. परंतू तीन दिवसापासून हा सिसीटिव्ही खांबासह गायब झाल्याचे दिसून येत आहे.
मधू शिनगारे, रहीवाशी जयभिमनगर, मोरेवाडी )

# अंबाजोगाईत तिरंगा रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद; 'ऑपरेशन सिंदूर'मधील भारतीय लष्कराच्या शौर्याला सलाम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पहलगाम येथे नुकत्याच घडलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने व भारतीय लष्कराने संयुक्तपणे राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर या अत्यंत प्रभावी मोहिमेमुळे दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले गेले. देशाच्या सुरक्षेसाठी जीवाचे रान करणाऱ्या वीर जवानांच्या या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या शौर्याला मानवंदना देण्यासाठी आज अंबाजोगाई शहरात 'तिरंगा रॅली'चे आयोजन करण्यात आले.

या रॅलीचे आयोजन केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या पुढाकाराने करण्यात आले. शहरातील मंडीबाजार येथून सुरू झालेली ही तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, सदर बाजार मार्गे भगवान बाबा चौक व अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समारोपाच्या

◀◀ पान ३ वर



# दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थिनींचा गुणगौरव सत्कार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाकडून दहावी बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाले आष्टी तालुक्यातील दौला वडगाव येथील सरस्वती विद्यालयातील प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकावर यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक करण्यात आले.

इयत्ता दहावी मध्ये प्रथम क्रमांक कु - शेख जिया कासम ९३. २०% द्वितीय क्रमांक कु- कोहोक कल्याणी रमेश ९२. २०% तृतीय क्रमांक कु - कोहक अश्विनी बाळू ९२. २०% आणि इयत्ता बारावी मध्ये प्रथम कु. दिपाली दिनकर फसले,कु.प्राची प्रशांत फसले,कु. भारती अशोक राऊत या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनीचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते श्री महादेव कोहक, ग्रामपंचायत सदस्य सोनाली महादेव कोहक, ग्रामपंचायत सदस्य अंकुश गव्हाणे, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी परभणे, अरबाज खान, प्रवीण आठवले नितीन फसले,निलेश फसले, प्रकाश कोहक, प्रशांत फसले, आदि

◀◀ पान ३ वर



# राजनंदिनी पाटील हिचे दहावी परिक्षेत यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचालित खोलेश्वर मा. विद्यालयाची विद्यार्थीनी कु राजनंदिनी रमाकांत पाटील हिने दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९३. ४० टक्के गुण प्राप्त केले असून संस्कृत विषयात १०० पैकी १००तर इंग्रजी विषयात १००पैकी ९६गुण प्राप्त केले आहेत तिचे सर्वत्र कौतुक होत आहे



खोलेश्वर माध्यमिक विद्यालय अंबाजोगाई येथील दहावी वर्गात सेमी इंग्रजी मध्ये शिकणारी व गीतेचा पंधरावा अध्याय मुखपाठ असणारी विद्यार्थीनी कु. राजनंदनी रमाकांत पाटील हिने इंग्रजी मध्ये १००पैकी ९६ तर संस्कृत मध्ये १००पैकी १०० गुण मिळवले आहेत. तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे मुख्याध्यापक विवेक

◀◀ पान ३ वर

# एकलव्य माध्यमिक विद्यालय चिखलबीड या शाळेची उज्वल यशाची परंपरा कायम

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील अतिशय दुर्गम व डोंगराळ भागात असलेली अरुणा असफअली महिला मंडळ बीड संचलित,एकलव्य माध्यमिक विद्यालय चिखलबीड,या शाळेने इयत्ता दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये देखील उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत शाळेतून चि.रोहन शिंपले ८७.२०% गुण घेऊन पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. कु.सीमा वडने ८५.६०% व विरेन चव्हाण ८५.२०% गुण घेऊन अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.शाळेतून एकूण ४९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्या पैकी १७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण असून,२१ विद्यार्थी प्रथम श्रेणीने उत्तीर्ण आहेत.व उर्वरित पास झाले आहेत.



तर मुंडे ऋषिकेश सुभाष यांनी ३५.२०% गुण घेऊन इतिहास रचित पास झाला आहे या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेच्या संस्थापिका लोकनेत्या,वंचित, उपेक्षितांचा बुलंद आवाज आदरणीय प्रा.सुशीलाताई मोराळे, संस्थेचे

◀◀ पान ३ वर

# शालांत परीक्षेत श्री राजर्षी शाहू विद्यालय तळेगाव (घाट) शाळेचे घवघवीत यश!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील तळेगाव (घाट) येथील अभिनव शिक्षण संस्था, अंबाजोगाई संचालित श्री राजर्षी शाहू विद्यालय या शाळेने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले. या वर्षी शाळेचा निकाल ९२.८५ टक्के एवढा लागला आहे. शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. बर्दापूर केंद्रातून व शाळेतून अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्यांसह सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे.



वेदश्री मुकुंद सिरसाट (९७.४०) | रेणुका कोंडीराम वाघमारे (९०.८०) | श्रीनिवास संतोष कांबळे (८८.८०)

## शाळेने उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली

अभिनव शिक्षण संस्था, अंबाजोगाई संचालित श्री राजर्षी शाहू विद्यालय या शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या सातत्यपूर्ण अभ्यास, चिकाटी आणि शिस्तीच्या बळावर हे यश मिळविले आहे. शाळेचे विशेष प्रविण्यात १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम श्रेणीत ८ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेच्या वेदश्री मुकुंद सिरसाट हिने (९७.४०) टक्के गुण घेऊन बर्दापूर केंद्रातून व शाळेतून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. तर कु.रेणुका कोंडीराम वाघमारे हिने (९०.८०) टक्के गुण घेऊन द्वितीय येण्याचा आणि श्रीनिवास संतोष कांबळे या विद्यार्थ्याने (८८.८०) टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला आहे हे विशेष होय. शाळेने शैक्षणिक क्षेत्रात प्राप्त केलेल्या या उज्वल यशाबद्दल संस्थेचे सचिव शिवाजीराव चन्नागिरे, सर्व संस्था संचालक मंडळ, बीड जि.प.चे माजी सदस्य संजय गिराम, तळेगाव (घाट) व वालेवाडी गावचे सरपंच, सेवा सहकारी

◀◀ पान ३ वर

# महाराणी ताराबाई विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राखली दहावीच्या परीक्षेत उज्वल यशाच्या निकालाची परंपरा

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने फेब्रुवारी,मार्च-२०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकालात वडवणी शहरातील संस्कार शिक्षण मंडळ संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ९५.६५ % निकाल लागला असून प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी फेब्रुवारी,मार्च -२०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार दि.१३ मे २०२५ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९५.६५ इतका लागलेला आहे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षसाठी एकूण २३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी २२० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



**महाराणी ताराबाई विद्यालयाची कु.हर्षदा नाईकवाडे ९७.०० गुण घेऊन प्रथम तर कु.साक्षी खाडे ९६.८० गुण घेऊन व्दितीय व कु. समृद्धी पाटोळे ९५.६० % गुण घेऊन १० वी बोर्डाच्या परीक्षेत वडवणी शहरातून तृतीय**

विद्यालयातून कु.हर्षदा हनुमंत नाईकवाडे ९७.०० % गुण घेऊन वडवणी शहरात प्रथम आली आहे तर कु.साक्षी योगीराज खाडे ९६.८०% गुण घेऊन द्वितीय आली आहे व कु.पाटोळे समृद्धी विनोद ९५.५० गुण घेऊन वडवणी शहरातून तृतीय आली आहे तर कु.झाडे निकिता नवनाथ ९५.०० गुण घेऊन उत्तीर्ण झालेली आहे

विद्यालयातील २२ विद्यार्थी ९० % पेक्षा अधिक गुण घेऊन यश संपादन

◀◀ पान ३ वर


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विद्यार्थ्यांनी फ्राईड राईस आणि नूडल्स मागवले; पण जेवणात रबर निघाले, पुणे विद्यापीठातील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या फूड कोर्टमधून ही घटना समोर आली आहे. फूड कोर्टमधील कॅन्टीनच्या जेवणात रबर निघाल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. तसेच या प्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या फूड कोर्टमधील ठेंीश ९३ या चायनीज गाळ्यात हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या जेवणात रबरसदृश पदार्थ आढळल्याचा आरोप केला आहे. विद्यार्थ्यांनी बुधवारी सायंकाळी जेवणाच्या वेळी फ्राईड राईस आणि नूडल्स मागवले होते. त्यामध्ये रबरसारखा पदार्थ आढळून आल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी गाळ्याच्या स्वच्छतेबाबत आणि अन्नाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे तक्रार दाखल केली आहे. तसेच संबंधित गाळ्याची तपासणी करण्याची मागणी केली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, विद्यापीठ प्रशासनाने अन्नाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी अन्न गुणवत्ता नियंत्रण समिती स्थापन केली आहे.

या समितीने यापूर्वीही अन्नातील स्वच्छतेच्या तक्रारींबाबत तपासणी केली होती. उदाहरणार्थ, काही महिन्यांपूर्वी विद्यार्थ्यांनी हॉस्टेलच्या जेवणात झुरळे आणि अळ्या आढळल्याची तक्रार केली होती. ज्यामुळे मेस बंद करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे केंद्रीकृत स्वयंपाकघराची मागणी केली आहे.

ज्यामुळे अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता सुनिश्चित केली जाऊ शकते. प्रशासनाने या मागणीचा विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. या घटनेचा सखोल तपास सुरू आहे. तसेच दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# दौंड तालुक्याला अवकाळी पावसाने झोडपले; अनेक गावांमध्ये विजेचा कडकडाट, जनजीवन विस्कळीत



**दौंड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील अनेक गावांमध्ये विजेच्या कडकटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. तालुक्यातील केडगाव, पाटस, वरवंड, कुरकुंभ यासह काही भागात मुसळधार पावसाच्या सरी कोसळल्या. परिणामी, काढण्यात आलेला कांदा, गहू व इतर शेत पिकांचे नुकसान झाले आहे. या पावसाचा वीटभट्टी व्यावसायिकांनाही मोठा फटका बसला आहे.**

मागील तीन महिन्यांपासून उष्णतेच्या तीव्रतेने आणि उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना अवकाळी पावसामुळे थोडाफार दिलासा मिळाला आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. तीव्र उन्हात दुपारनंतर अचानक आकाशात काळे ढग आल्याने ढगाळ वातावरण निर्माण झाले. विजेच्या कडकटासह अवकाळी पावसाने सुरुवात केली. तालुक्यातील पाटस, केडगाव, वरवंड, कुरकुंभ, दौंड यासह अनेक भागांमध्ये चांगला पाऊस झाला.दरम्यान, पाटसमध्ये सोमवारी सायंकाळी सहाच्या पुढे अचानक मुसळधार पावसाला सुरुवात झाली. परिणामी, पाटसच्या आठवडे बाजारात आलेल्या नागरिकांची धांदल उडाली. तर, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेतात काढणीस आलेला कांदा, गहू आणि इतर शेत पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच चौफुला, केडगाव, पाटस या भागातील वीटभट्टी व्यावसायिकांचे या पावसाने मोठे नुकसान केले आहे.

# जुन्या वादातून दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी

मांडवगण फराटा : मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथे एका लग्नसमारंभात जुन्या वादातून दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना मंगळवारी (दि. १३) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून शिरूर पोलिसांनी दोन्ही गटांतील १३ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



एकाच गावातील लग्नसमारंभाचा कार्यक्रम मांडवगण फराटा येथे होता. त्यामुळे दोन्ही गट समोरासमोर आले. त्यांच्यात रस्त्यामध्येच वाद सुरू झाला. या वादाचे रूपांतर भांडण होऊन हाणामारी झाली. यानंतर दोन्ही गटांनी रात्री उशिरा एकमेकांविरोधात शिरूर पोलिस ठाण्यामध्ये फिर्याद दाखल केली. याप्रकरणी ऋषिकेश नितीन जाधव (वय २३, रा. नानगाव, ता. दौंड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संदीप दत्तात्रय शेलार, हर्षद बाळासो खळदकर व विशाल केशव खळदकर (सर्व रा. नानगाव, ता. दौंड) यांच्याविरुद्ध मारहाण व जिवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी जाधव यांच्या फिर्यादीनुसार, आरोपींनी आमच्याकडे रागाने पाहतोस आणि कृष्णा लोंढे यांच्या घरी मदत करतो म्हणून रॉडने डोक्यात वार केला तसेच लाथाबुक्क्यांनी जबरी मारहाण करून शिवीगाळ केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. दुसरी फिर्याद साक्षी संदीप शेलार (वय २२, रा. नानगाव, ता. दौंड) यांनी दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी ऋषिकेश नितीन जाधव यांच्यासह संदीप ऊर्फ गुलाब पोपट खळदकर, विक्रांत ऊर्फ विकास पोपट खळदकर, महेश बापूराव इंगळे, अभिजित संजय खळदकर, शिवाजी चंद्रकांत खळदकर, निखिल मच्छिंद्र निगडे, शेखर गोविंद खळदकर, सुशांत वसंत खळदकर, अनिकेत शंकर इंगळे (सर्व रा. नानगाव, ता. दौंड) या दहा जणांविरुद्ध विनयभंग, मारहाण, शिवीगाळ आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी साक्षी यांच्या फिर्यादीनुसार त्यांचे पती संदीप शेलार यांनी केडगाव पोलिस चौकीत तक्रार दिल्याच्या रागातून या आरोपींनी संदीप शेलार व फिर्यादी साक्षी शेलार यांच्यावर अचानक हल्ला केला. यामध्ये साक्षी यांचा विनयभंग केला असून, पती संदीप यांना दगडाने मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलिस करीत आहेत.

# झोपडपट्टी होता कामा नये, सर्वांना घर देणं हे पंतप्रधान मोदींचं स्वप्न, एकनाथ शिंदेंचं वक्तव्य

पुणे । प्रतिनिधी

सर्वांना घर देणं हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. त्यात पुढाकार घेऊन आपण काम केलं पाहिजे असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. एक इंचही अतिक्रमण होता कामा नये, यावर तुमचा फोकस असला पाहिजे. भविष्यात नवीन झोपडपट्टी होता कामा नये, अनधिकृत बांधकामे होऊ नयेत असेही एकनाथ शिंदे म्हणाले. पुण्यात आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.



दर्जेदार काम करुन घेणे हे अधिकाऱ्यांचे काम

आपण फील्ड वर गेलं पाहिजे, आम्ही फील्ड वर गेलो, तेव्हाच आम्हाला समजतं असेही एकनाथ शिंदे म्हणाले. फील्डवर गेलो तेव्हाच इतरांवर दबाव होतो, पैसे तर देतोच आपण त्यांना, दर्जेदार काम करुन घेणे हे अधिकाऱ्यांचे काम आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. पैसे देऊन काम खराब झालं तर विरोधी पक्षाला आयते कोलीत मिळतं असेही एकनाथ शिंदे म्हणाले. महिन्याला महत्त्वाचा प्रकल्पाला फिल्ड व्हिझीट झालीच पाहिजे असंही एकनाथ शिंदे म्हणाले. नवीन यू डी सी पी आरमध्ये अनेक बदल आपण केले आहेत. महायुतीचे सरकार आल्यावर आपण आपल्यामध्ये आलेले स्पीडब्रेकर काढून टाकल्याचे शिंदे म्हणाले.

स्मार्ट सिटीसाठी खूप मोठा निधी आपण दिला आहे. राज्याला सुद्धा लशीीं शिीेीळपस डीरींश हा पुरस्कार मिळाला आहे. एफडीआयमध्ये राज्य पाहिलं आहे. मुख्यमंत्री यांनी दावोस येथे जाऊन एमओयू केले आहेत. त्यामुळं सुद्धा रोजगार निर्मिती होणार आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. डबल इंजिनटं सरकार वेगवान काम करताना दिसत आहे. त्यामुळं जबाबदारी वाढली आहे. अधिक वेगवान कामाची अपेक्षा आपल्याकडून असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. मी पण नगरसेवक होतो, देवेंद्र जी महापौर होते, मी सभागृह नेत्यापर्यंत गेलो तिथून आमदार झालो आम्हाला प्रशासन आणि लोकप्रतिनिधी दोन्हीचा अनुभव असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

नागपूर शहरामध्ये विकास चांगला होतोय. इतर राज्यात काय केलं आहे हे आपण पाहायला पाहिजे. इंदौर, चेन्नईमध्ये काय केलं आहे हे पाहायला पाहिजे असेही एकनाथ शिंदे म्हणाले. प्रत्येक शहर मुख्य प्रवाहात आलं पाहिजे असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

# नागरी संरक्षण दलाच्या मॉक ड्रीलचे आयोजन; उत्साही पुणेकर मोठा संख्येने सहभागी

पुणे : जम्मू काश्मीर येथील पहलगाम हल्ल्याच्या नंतर देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने, केंद्रीय गृह मंत्रालया मार्फत देशभरात विविध ठिकाणी मॉक ड्रील घेण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार नागरिकांच्या संरक्षणासाठी तयार केलेले स्वयंसेवी संघटना म्हणजेच 'नागरी संरक्षण दल' आहे. हे दल महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाअंतर्गत कार्यरत असून, याची राज्यात पुणे, ठाणे, उरण, तारापुर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि नाशिक या ठिकाणी कार्यालये आहेत. या नागरी संरक्षण दलाच्या आवाहानुसार युध्दजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने जागोजागी घेण्यात आलेल्या मॉक ड्रिलमध्ये नागरिकांचा उस्फुर्त सहभाग नोंदविला आहे.



पुणे जिल्ह्यातील नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांची आपत्कालीन प्रसंगी मदत होते. याच स्वयंसेवकांच्या मदतीने नुकतीच लोणीकंद येथे मॉक ड्रिल घेण्यात आली. फूड प्रोसेसिंग करणाऱ्या वेकफील्ड कंपनीचा भोंगा दुपारी १२ वा ५८ मिनिटांनी वाजवून परिसरातील नागरिकांना धोक्याचा इशारा देण्यात आला. परिसरातील सर्व नागरिक सुरक्षित ठिकाणी आसरा घेण्यासाठी एकत्र येऊन उभी राहिली. त्याच बरोबर वेकफील्ड कंपनीमधील सर्व अधिकारी व कर्मचारी कोणतीही धावपळ न करता सुरक्षित असेंबली पॉईंटच्या ठिकाणी येऊन उभे राहिले. या वेळी स्वाती शितोळे, सौमीक बसक, केतन चव्हाण या अधिकाऱ्यांनी बाहेर आलेल्या कर्मचारी व अधिकारी यांची गणती केली व सर्व कर्मचारी सुरक्षित बाहेर आल्याची खात्री केली.

यावेळी नागरी संरक्षण दलाचे सहाय्यक उपनियंत्रक अर्जुन कुऱ्हाडे व आनंद शिंदे यांनी आग म्हणजे काय?, आगीचे प्रकार, आग विजवण्याच्या पद्धती व उपाययोजना याबाबत माहिती दिली तसेच. उपविभागीय क्षेत्ररक्षक राहुल पोखरकर यांनी अग्निशामक यंत्र आग विजवण्यासाठी कसे वापरावे, घरगुती गॅस (एल.पी.जी.) घरात पसरल्यानंतर काय उपाययोजना करावी, घरगुती गॅस (एल.पी.जी.) सिलेंडरला आग लागल्यास काय करावे व आग कशी विजवावी याबाबत मार्गदर्शन केले. त्याच ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र, वाघोली येथील १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका उपस्थित झाली. रुग्णवाहिकेचे डॉक्टर सागर जाधव यांनी १०८ आपत्कालीन रुग्णवाहिकेचे कार्यान्वित असलेली यंत्रणा, रस्ते अपघातातील रुग्ण हाताळणे, रुग्णाला स्ट्रेचरवरुन वाहून नेणे, सी.पी.आर., उष्माघात, इत्यादी बाबत मार्गदर्शन केले व रुग्णवाहिकेचे माहिती सादर केली. सदर मॉक ड्रिल वेळी होमगार्ड, आपदा मित्र, स्थानिक नागरीक, कंपनीचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक, आरोग्य कर्मचारी असे एकूण ९२ व्यक्तींनी सहभाग घेतला होता.

# वन्यजीव शिकारप्रकरणी मोठी कारवाई! जुन्नर वन विभागाच्या धाडीत २१ शिकारी ताब्यात

जुन्नर : जुन्नर वन विभागाच्या राखीव वनक्षेत्रामध्ये शिकारीच्या उद्देशाने आलेल्या २१ जणांना शिकारीसाठी आणलेले साहित्य तसेच १० दुचाकींसह वन विभागाने ताब्यात घेतल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी दिली. ताब्यात घेतलेल्या आरोपीमध्ये सुराळे (ता. जुन्नर) येथील १५, हडसर (ता. जुन्नर) येथील ४ तसेच तेजूर व मांगनेवाडी येथील प्रत्येकी एकाचा समावेश आहे.




वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. १३) हडसर (ता. जुन्नर) येथील राखीव वनक्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या उद्देशाने अज्ञात व्यक्ती मोठ्या संख्येने संशयास्पदरीत्या फिरत असल्याबाबतची माहिती वनरक्षक एकनाथ बांगर यांना मिळाली. त्यांनी ही बाब वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांना कळवली. वनपरिक्षेत्र अधिकारी चव्हाण यांनी घटनास्थळी अतिरिक्त मनुष्यबळ पाठवून वन्यप्राण्यांच्या शिकारीकरिता आणलेल्या २१ जणांना त्यांनी आणलेल्या एकूण २१ वाघर, १० दुचाकी वाहनांसह घटनास्थळी ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.दरम्यान, नीलेश मच्छिंद्र केदारी, रमेश ज्ञानेश्वर केदारी, प्रदीप किसन केदारी व किसन केशव भले हे तपासकामामध्ये सहकार्य करीत नसल्याने व दिशाभूल करणारी माहिती देत असल्याने त्यांना मंगळवारी (दि. १३) सायंकाळी अटक करण्यात येऊन त्यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जुन्नर यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने वरील चारही आरोपींना २ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यातील अन्य १७ आरोपींनी गुन्ह्याबाबतची कबुली दिली असून, त्यांना बंधपत्रावर मुक्त करण्यात आले.ही कारवाई जुन्नर वन विभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक वनसंरक्षक स्मिता राजहंस, अमृत शिंदे व वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्या संयुक्त पथकाने केली.

# लोकमान्य सोसायटीतर्फे ऑपरेशन सिंदूरवर व्याख्यानाचे आयोजन

पुणे : लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने ऑपरेशन सिंदूर चे विविध पैलू उलगडून दाखविणाऱ्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या (शुक्रवार,१६ मे) सायंकाळी सहा वाजता नवी पेठ स्थित एस एम जोशी हॉल येथे हे व्याख्यान होणार आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असणार आहे.

ऑपरेशन सिंदूरवर सुप्रसिद्ध लेखक आणि व्याख्याते हेमंत महाजन (निवृत्त) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी लोकमान्य सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष व जेष्ठ पत्रकार किरण ठाकूर हे असणार आहेत.व्याख्यानानंतर ब्रिगेडियर महाजन हे उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे देणार आहेत.

पुणेकर नागरिकांनी या व्याख्यानास उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन लोकमान्य सोसायटीतर्फे पुणे विभागीय प्रमुख सुशील जाधव यांनी केले आहे. काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय नागरिकांचा बळी गेला त्यानंतर भारतीय लष्कराने धडक कारवाई करत पाकिस्तानच्या सहाहून अधिक हवाई तळे उध्वस्त केले आहेत.

# भीषण अपघातात युवक ठार; ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दाखवले प्रसंगावधान

केळवडे : सातारा-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील केळवडे गावाच्या हद्दीत, न्यू फुटबॉल ग्राउंड समोर, दि. १५ मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. मृत युवक कराड मलकापूर येथील असून, दुचाकीने पुण्याहून कराडकडे जात असताना ही दुर्घटना घडली. अपघातग्रस्त युवकाची दुचाकी रस्त्याच्या डिवायडरच्या उजव्या बाजूस पडलेली होती. घटनास्थळी मदतीसाठी कुणीही थांबत नसताना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) भोर तालुकाप्रमुख शरद विश्वास जाधव (केळवडे) व सामाजिक कार्यकर्ते अनिकेत रमेश शिळीमकर (कुरुंगावडी) यांनी प्रसंगावधान राखून अपघातस्थळी धाव घेतली आणि महत्त्वाचे मदतकार्य उभारले.

मृत युवक सुरज दिलखुश सुर्यवंशी (वय २९, रा. जखीनवाडी, ता. कराड, जि. सातारा) हा चक-१२-उट-६६०७ या क्रमांकाच्या दुचाकीवरून पुणेहून कराडकडे जात होता. न्यू फुटबॉल




ग्राउंडजवळील हॉटेल राजस्थानी समोर रात्री सुमारे ११:४५ वा.च्या सुमारास अज्ञात वाहनाने मागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर वाहन चालक घटनास्थळावर न थांबता पसार झाला.घटनेच्या काही वेळातच शरद जाधव आणि अनिकेत शिळीमकर हे घरी परतत असताना रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दुचाकीस्वार त्यांच्या नजरेस पडला. गाड्यांचे ट्राफिक चालू असताना दोघांनी प्रसंगावधान राखून ट्राफिक एका बाजूने वळवले, अपघातस्थळ सुरक्षित केले आणि तत्काळ सिद्धिविनायक हॉस्पिटल, नसरापूर येथे संपर्क साधला.

शरद जाधव यांनी डॉ. राजेंद्र डिंबळे सर यांच्याशी संपर्क साधून म्बुलन्सची विनंती केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गायकवाड म्बुलन्स चालक काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाला. छक्ख आपत्कालीन सेवा गाडी देखील तत्काळ मदतीसाठी आली. मृतावस्थेतील अपघातग्रस्तास रात्री १.१५ वा. सिद्धिविनायक हॉस्पिटल, नसरापूर येथे नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

मृताच्या खिशातील मोबाईलमधील संपर्क क्रमांकावरून सुर्यवंशी कुटुंबीयांशी तातडीने संपर्क साधण्यात आला व अपघाताची माहिती देण्यात आली. यासोबतच राजगड पोलीस स्टेशन येथे देखील अपघाताची माहिती कळविण्यात आली. आय बी न्यूज संपादक व प्रभात पत्रकार विशाल शिंदे यांनाही घटनेची तात्काळ माहिती देण्यात आली. या प्रकरणी धिरज सुर्यवंशी यांनी फिर्याद दिली असून राजगड पोलीस ठाण्यात गु.र.नं. १९३/२०२५, इछड कलम २८१, १२५(र), १२५(ल), १०६(१), आणि मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/१७७ अंतर्गत अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.